महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी

स्मृति-अंक



निधन : २५ डिंसेंबर १९४९.

युगवाणी

फेब्रुवारी १९५०

卐

कै. दिवाणजींना श्रद्धांज

★

या अंकांत—

श्री. ना. बनहट्टी
यशवंत खुशाल देशपांडे
वा. वि. मिराशी
स. गो. सोमलवार
वि. भि. कोलते
माधव गोपाळ देशमुख
ग. त्र्यं. देशपांडे
काका सहस्रबुद्धे
ना. रा. शेंडे
दा. ल. अडोणी
रा. पु. सगदेव
भी. गो. देशपांडे
पद्माकर निमदेव
के. ब. कदम
सुरेश भट्ट
अच्युत केशव पांडे
राम देशपांडे
गणेश निंभोरकर

★

संपादक :
वामन कृष्ण चोरघडे

★

वर्ष ५ वें अंक

किंमत आठ आणे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्रऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष पांचवें] **युगवाणी** फेब्रुवारी १९५० [अंक दुसरा

वार्षिक वर्गणी पांच रु. सभासदांना फक्त तीन रु.

आंवतन—

अभी जामे उम्र भराही न था, कफ़े दस्त साक़ी छलक पड़ा
रही दिलकी दिलमें हसरतें, नशा कज़ाने मिटा दिया।

दिवाणजी,

जगण्यासारखें जोपर्यंत कांही जवळ आहे तोपर्यंतच मरणांत मौज आहे, असें थोर लोकांचें वचन आहे. तुमच्याजवळ जगण्यासारखें सर्वच होतें. म्हणून तुम्ही मरण्याची मौज लुटली. पण जातांना सर्वांना रडवून गेलांत. हा अंक तुमच्या स्मृतीला अर्पण करतांना प्रुफें तपासण्याचें व संपादनाचें कार्य मज अभाग्याकडे आलें. ओळी ओळी साठीं माझे डोळे भरले आहेत. तसें तत्वज्ञाच्या दृष्टीने पाहिलें तर 'गतं न शोच्यं' असें आहे; पण आमचा स्वार्थ आम्हांला दिसतो, तुमच्या शकुंतलाबाई, तुमच्या शीर्ण करुण मातुश्रींची मूर्ति, तुमचीं छोटीं छोटीं पांखरें, त्यांच्या वासलेल्या चोंची; दिवाणजी, सर्व दिसतें आणि जीवाचं पाणी होतें.

नारायणराव! तुम्ही गेल्यावर काय काय घडलें ठाऊक आहे ना? आपल्या प्रांतांत पंडित जवाहरलाल नेहरू येऊन गेले. त्यांनी पदवीधरांना संदेश दिला—'संकटें बऱ्यासाठी असतात कारण त्यामुळें माणसाचे सर्व गुण कसास लागतात.'

तुम्ही गेल्यावर जानेवारीची २६ तारीख उजाडली. आपण अगदी अगदी स्वतंत्र झालों. आपलें संघराज्य स्थापन झालें. आपल्या देशाच्या भाग्यविधात्यांनी देशाच्या कल्याणासाठीं व निष्ठेसाठी आणाशपथा घेतल्या. आतां आपण जगांत आपलें माथें उंच करून मिरवूं. हा दिवस यावा म्हणून किती कितीकांनी जीवाचें रान, नि जीविताचा होम केला होता. त्यांच्या रक्तांत त्यांच्या अश्रूंत माती भिजवून हें स्वतंत्रतेचें मंदिर उभें झालें आहे!

म्हणूनच तुमची आठवण आणि तुमच्या कार्याची जाणीव! तुम्हाला माहित आहे ना की तुमचा विदर्भसाहित्यसंघ आता खूप खूप फोफावणार. श्री. माडखोलकर अध्यक्ष झाले नि कामाला लागले. आपल्या संघाची इमारत उभी करण्यासाठी, संघाचे सभासद यंदा, अगदी यावर्षीचा एक हजारपर्यंत नेण्यासाठी संकल्प सोडला गेला. हें सर्व नक्की नक्की होणार बरें—!

आणि तुमची अंतिम इच्छा की चांद्याला यंदाचें संघाचें अधिवेशन झालेंच पाहिजे—ती देखील पूर्ण झाली. ता. ४-५ फेब्रुवारीला चंद्रपुरींत मराठी भाषेच्या प्रेमिकांची यात्रा भरणार. खूप खूप मंडळी येणार आहेत—ज्यांना आमंत्रण गेलें ती, ज्यांना चुकून गेलें नाही तीहि, खूप उत्साह राहील—

आणि तुमची आठवण सर्वांना येईल, काका सहस्रबुद्धे रडतील, दादासाहेब बनहट्टी कळवळतील, कोलते देशमुखांचीं तरणी मनें विरघळतील, तुमचे मित्र कासावीस होतील, म्हणूनच विनंति अशी की तुम्ही या. येणारच तुम्ही! या नि सर्वांना सांगा की छे छे, असें कळवळून चालायचें नाही. सर्वांना जाणीव द्या.

आम्ही तुमची वाट पाहूं. तुम्ही या. येणारच तुम्ही!

आम्ही तुमची वाट पाहूं!

तुमचा दुर्दैवी मित्र,
वामन कृष्ण चोरघडे

नागपूर, ३१-१-५०

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जगमैत्र नारायणराव

श्रीनिवास नारायण वनहट्टी.

☆

नोव्हेंबरची २९ तारीख. दिल्लीस कौन्सिल हाउसमध्ये रोजच्या ठरीव क्रमाप्रमाणे भाषापरिषदेचें दुपारचें अधिवेशन सुरू होण्याच्या बेतांत होतें. मी नुकताच येऊन कामाचे कागद चाळीत होतों, इतक्यांत डॉ. माधवराव देशमुख आले आणि एक वर्तमानपत्र माझ्यापुढे सरकवून देऊन गुपचूप आपल्या जागीं जाऊन बसले. वर्तमानपत्राकडे नजर फेकली तों एका कोपऱ्यांत खूण केलेली नागपूरची बातमी! मोटार अपघातांत श्री. दिवाणजी व मंदे गतप्राण !! पुन: पुन्हा नजर फेकावी, तोच मजकूर—तेच क्रूर शब्द ! हीव भरल्याप्रमाणे होऊन माझें अंग थरथर कापूं लागलें.

× × ×

तसा नारायणरावांचा आणि माझा परिचय फार जुना नव्हता. परंतु आपल्या गोड स्वभावाने त्यांनी मनाला असा कांही लळा लाविला होता, की त्यांची हानि म्हणजे आपल्या काळजाचा एक कोपरा कापल्याप्रमाणे वाटावें. जुलै १९४४ मध्ये मी अमरावतीस बदलून गेलों. त्याच्यापूर्वी त्यांची माझी ओळख झालेली होती; पण थोडीशीच. १९४४ सालीं अमरावतीस गेल्यानंतर साहित्य व शिक्षण क्षेत्रांतील ज्या ज्या कार्यकर्त्यांशी तेथे परिचय झाला, त्यांत दिवाणजींच्या परिचयाचें गाढ स्नेहांत त्वरित रूपांतर झालें. त्यांच्या अंगचे नानाविध गुण हेच याला कारणीभूत होते. त्या सर्व गोष्टी आठवल्या म्हणजे " किती गुण ते त्यांचे चित्तीं स्मरूनि रडूं तरी " असें मनाला होतें.

× × ×

अमरावतीचें त्यावेळचें किंग एडवर्ड कॉलेज आणि सध्याचें विदर्भ महाविद्यालय त्याच्या बाजूला असलेल्या बंगल्यांपैकी एका बंगल्यांत मी राहत होतों. तेथे एका रविवारी (अगर सुटीच्या दिवशी) दोन प्रहरीं पांच मंडळी माझ्याकडे आली. श्री. द. शं. उर्फ दादासाहेब फडके, काका सहस्त्रबुद्धे, निमदेव, आपटे आणि दिवाणजी. या सर्व मंडळींनी रंगभूशतसांवत्सरिक महोत्सव अमरावतीस एकजुटीने आणि परमोत्साहाने साजरा केला होता. ही सिद्ध झालेली एकजूट आणि हा जागृत झालेला उत्साह कोणत्या तरी कायम स्वरूपाच्या वाङ्मयकार्यामध्ये परिणत करावा ही आकांक्षा या मंडळींच्या मनामध्ये उद्भवली होती. या आकांक्षेला वाट फोडण्याच्या उद्देशाने हें पंचक मजकडे आलें होतें.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटाघाटींत असें ठरलें की विदर्भसाहित्यसंघ ही जी या प्रांतांतील सर्व मराठी जनतेची श्रेष्ठ साहित्यसंस्था, तिचें पुनरुज्जीवन करावें; गेलीं ७-८ वर्षे ती ज्या योगनिद्रेचा अनुभव घेत आहे त्यांतून तिला जागृतावस्थेंत आणून चालती बोलती, वाढती नांदती करावी. जमलेल्या मित्रपंचकाला मीं सांगितलें, की हें सर्व करतां येईल; संस्थेला पुनरुजीवित करण्यासाठी जें सव्यापसव्य करावें लागेल तें आपण करूं—संस्था चालू होईल. पण मुख्य प्रश्न यापुढचा आहे. संस्था चालूं करणें सोपें असतें. नंतर चिकाटीनें अनेक वर्षे तिची जोपासना करणें, तिच्या खस्ता खाऊन (व लोकांच्या शिव्या खाऊन) तिला नांवारूपाला आणणें हेंच खरें कठीण काम असतें. तें करण्याचा जर आपला कृतनिश्चय असेल तरच आपण पाऊल उचलावें; नाहीतर आपल्या महोदार संस्कृत भाषेनें 'अनारम्भो हि कार्याणां प्रथमं बुद्धि लक्षम्,' 'मौनं सर्वार्थ साधनम्' इत्यादि सोइस्कर सुभाषितें आपल्यासाठी घडविलेलीं आहेतच. त्यांचा आश्रय करून स्वस्थ बसावें हें उत्तम. जो कांहीच करीत नाही तो सर्वांत अधिक शाहणा!

रीतीप्रमाणे आश्वासनें दिलीं गेलीं; अभिवचनें, आणाभाका वगैरे प्रकारहि व्हायचे ते झाले. परंतु त्यांतून टिकले दोघे—नारायणराव दिवाणजी आणि काका सहस्त्रबुद्धे. हे दोघे दोन्ही बाजूंना गाडून उभे नसते, तर विदर्भसाहित्यसंघाची पुनःप्रतिष्ठापना झाली नसती व त्याचें कार्य जें आज भराला आलें आहे तेंहि आलें नसतें.

× × ×

त्यांतहि दिवाणजींचें कौतुक विशेष. उघड दिसणाऱ्या गोष्टींच्या आधारें तुलना केली, तर काका सहस्त्रबुद्धे खास, मजवर रागावणार नाहीत. कार्यकर्ता या नात्याने त्यांची किंमत काय आहे, हें माझ्याइतका जाणणारा दुसरा कोणी क्वचितच असेल, हें त्यांस माहीत आहे. पण काका सडे आहेत. आईबाप, भाऊ भावजय आणि स्वतःचा वाढता संसार, कौटुंबिक पाश व गुंतागुंत जवळजवळ नाहींच. नोकरी वगैरेचा निकाल लागलेला असल्यामुळे वैयक्तिक आकांक्षा उरलेल्या नाहीत. दिवाणजी यांचें सर्वच याच्या उलट. कष्टमय परिस्थितींतून स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या आणि श्रमशीलतेच्या जोरावर विद्या करून उजागराला आलेला हा स्वयंनिर्मित (selfmade) तरुण! पोहायला उतरलेल्या माणसाचे हातपाय कमल-वेलीच्या जाळ्यांत गुंतावे त्याप्रमाणे आईबाप, भाऊ भावजय, आणि स्वतःचा वाढता संसार यांच्या पाशांत जखडलेला हा तरुण, उमदा स्वभाव आणि दांडगी महत्वाकांक्षा यांच्या जोरावर जगाच्या रंगणांत उतरून आपला मार्ग कापीत पुढे चालला होता. कोणाचाहि व कशाचाहि आधार नसतां त्यांनी आजवर मिळविलेलें यश येवढें स्पृहणीय होतें, की त्यांचा भविष्यकाळ कल्पनातीत उज्ज्वल होणार असें आमचें मन भाकीत वर्तवीत होतें. त्याच वेळी भविष्यकाळच्या अंधारांत भवितव्यता विकट हास्य करून आम्हाला वेडावीत होती!

× × ×

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अगदी गरीब स्थितींतून स्वतःच्या बुद्धीच्या व श्रमांच्या जोरावर विद्यार्जन करून उजागरास आलेले अनेक लोक मीं पाहिले आहेत. असा मनुष्य बहुधा तुसडा, माणूसघाण्या, निर्घृण व स्वार्थी—बहुतांशीं ' बापासि बाप न म्हणे ' अशा वृत्तीचा—बनतो. मोटा हुद्दा पटकावणें आणि पैशाच्या राशी रचीत बसणें यापरतें जगाच्या व्यवहारांत त्याला प्राधान्य उरत नाही. दिवाणजी असल्या घनश्याम पंथी लोकांच्या अगदी उलट होते. त्यांच्या स्वभावांत कांही एक विलक्षण प्रकारचा गोडवा होता. घरांत वृद्ध मातापितरें होतीं. त्यांच्याशी त्यांचें वर्तन सालस, प्रेमळपणाचें होतें. सुविद्य पत्नीबरोबर मांडलेला उमलता संसार—त्यांत द्रव्यबळ आणि माणूसबळ यांचा अभाव—लहान मुलांचीं दुखणींबाणीं, रडगीं-भेकणीं यांनी घर कटकटलेलें असायचें ! पण नारायणरावांच्या कपाळावर कधी रागाची अथवा वैतागाची आठी उमटली आहे किंवा चेहेऱ्यावरची हसरी छवी लोपली आहे असें कधी झालें नाही. मुलांना कडेवर घेऊन किंवा मांडीवर थोपटीत मित्रमंडळीबरोबर गप्पा किंवा सार्वजनिक कामांतल्या सहकाऱ्यांबरोबर त्यांच्या वाटाघाटी चालू असावयाच्या. घरच्या कामांना अगर कटकटींना ते कधी कंटाळले नाहीत किंवा घरगुती अडचणींच्या सबबीखातर सार्वजनिक कार्यें त्यांनी बाजूस सारलीं नाहीत. उलट, कार्यकर्त्यांच्या अभावीं जर एखादें काम अडलें असेल तर तेथे उडी घालून यांनी तें अंगावर घेतलेंच म्हणून समजावें.

× × ×

मित्र मंडळींचें अगत्य तरी किती ! त्यांच्या घरीं केव्हांहि मनुष्य जाऊन पोहचो, त्याला जेवायला आग्रह हा व्हावयाचाच ! चहाचें तर विचारूंच नका ! त्यांच्या घरीं केव्हांहि गेलें आणि चहा न घेतां सहीसलामत बाहेर पडूं म्हटलें, तर काय बिशाद आहे की आपला बेत सिद्धीस जाईल ! एकदा मी उभ्या उभ्या त्यांच्याकडे गेलों होतों; नागपूरच्या मोटारीची वेळ झालेली होती. मी म्हटलें " नारायणराव, चहाची गोष्ट आता काढूं नका. मला तीनचार मिनिटांपेक्षा अधिक थांबायला वेळ नाही. " लगेच शकुंतलाबाईंना त्यांनी साद दिली, " काय ग ! दादासाहेब म्हणताहेत, त्यांना तीन मिनिटांपेक्षा जास्त थांबायला वेळ नाही. तीन मिनिटांत तूं चहा देऊं शकशील का ? " त्या आंतून उत्तरल्या " हो, अगदी निश्चित. " मला मनांत वाटलें, चहाच्या आग्रहापायीं हा गृहस्थ आपली मोटार चुकविणार ! माझें बोलण्याकडे लक्ष लागेना. तों काय आश्चर्य, त्या माउलीनें खरोखरीच तीन मिनिटांच्या आंत चहाचा कप माझ्या हातांत आणून ठेवला ! आणि चहा झाला होता नेहमीसारखाच चवदार ! अगत्यांत आणि आगत स्वागतांत एकमेकांशी स्पर्धा करणारें असें हें प्रेमळ जोडपें होतें.

× × ×

नारायणरावांचें कलाप्रेम दांडगें होतें. संस्थासंचालनाच्या रुक्ष खटाटोपांत मनुष्य एकदा गुंतला म्हणजे पुष्कळदा तो आपली रसिकता गमावून बसतो. तसें त्यांचें झालें नव्हतें. त्यांचें नाट्यप्रेम आणि रंगभूमीविषयींची आसक्ति यांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सीमा नव्हती. कोठेहि कोणचेंहि नाटक बसत असो, तेथे मदतीची गरज आहे असें दिसून येतांच ते गरुडझेपेने धावणाऱ्या नारायणाप्रमाणे धावून जात आणि पडेल तें काम करीत. नाटकाच्या तालमी घेणें, गाणीं बसविणें, पात्रें रंगविणें, तबलापेटी वाजविणें, फार काय वेळ पडली तर पडदे ओढणें येथपर्यंत कोणचेंहि काम आनंदाने व उत्साहाने करण्यास ते तयार असत. शेवटची गोष्ट खेरीज करून बाकीच्या सर्व गोष्टी करतांना मीं स्वतः त्यांना पाहिलें आहे. इ. स. १९४६ साली नागपुरास ओरिअेन्टल कॉनफरन्स भरली त्यावेळी ‘ स्वप्नवासवदत्त ’ या संस्कृत नाटकाचा प्रयोग करण्यांत आला होता. तें बसविण्यांत आणि प्रत्यक्ष रंगभूमीवर आणण्यांत त्यांची अमूल्य मदत झाली होती. पुनरुज्जीवित विदर्भ साहित्य संघाचें पहिलें संमेलन १९४५ च्या मार्चमध्ये अकोट येथे भरलें, त्यावेळी ‘ नवीन कल्पना ’ हें नाटक अमरावतीहून बसवून अकोट येथे नेण्याच्या कामीं दिवाणजींनी जे परिश्रम घेतले, त्यांचें शब्दांनी वर्णन करणें शक्य नाही. या नाटकासाठी नवीन फ्लॅट सीन त्यांनी तयार करविला, अनेक अडचणींना तोंड देऊन तो त्यांनी मोटारींतून अकोट येथे नेला ! काम करणाऱ्या मंडळींची आण ने करण्याचें काम देखील त्यांच्याकडेच ! नाटकाच्या कामाचा एवढा अजस्त्र बोजा शिरावर वागवून शिवाय संघाच्या सरचिटणिशीची जबाबदारी पार पाडण्यास ते एका पायावर तयारच !

असे सरचिटणीस (आणि अर्थात् त्यांच्या जोडीला काका सहस्रबुद्धे) पुनरुज्जीवनसमयीं विदर्भसाहित्य संघाला लाभले, म्हणून तो कार्यक्षम राहून आजवर एकसारखा उत्कर्षाच्या पायऱ्या चढत आहे. मराठी भाषेची अधिकृत व प्रतिनिधिक साहित्यसंस्था म्हणून त्याला लोकमान्यत्व आणि राजमान्यत्व प्राप्त झालें आहे. नाहीतर संघ पुन्हा आपला योगनिद्रेत मग्न झाला असता !

x x x

संघाच्या कार्यासंबंधांत कोणतीहि उपयुक्त कल्पना काढली की ती मोकळ्या मनाने मान्य करून तिच्या सिद्धीसाठी जिवापाड परिश्रम करण्यास नारायणरावांनी सुरवात केलीच म्हणून समजावें. संघाच्या पुनरुज्जीवनाचें पहिलें ठळक चिन्ह म्हणून संमेलन भरवायचें—पूर्वीचें वर्ध्याचें आमंत्रण निष्फळ ठरलें; तेव्हा सर्व साधारण मत असें व्यक्त झालें की अमरावतीसच संमेलन भरवावें. पण मी निराळ्या विचाराचा आग्रह धरला. संमेलन दुसरीकडे कोठे तरी न्यावें; नागपूर अगर अमरावती येथे भरविण्यांत मोठेसें भूषण नाही. विशेषतः तालुक्याच्या ठिकाणी नेलें तर त्यांत भूषण आहे, प्रचार आहे, भाषाभिमान आणि साहित्य-प्रेम यांच्या वृद्धीचें श्रेय आहे, वगैरे वगैरे. विचार मांडला मी, परंतु तो उचलून धरला व त्याच्या सिद्धीसाठी जरूर ते परिश्रम केले दिवाणजींनी. अकोटकरांचा अर्ज आल्यानंतर तेथे अनेक खेपा घातल्या त्यांनी (व काकांनी), पत्रव्यवहार केला त्यांनी, संमेलनाच्या तयारींत निर्माण होणारे गुंते व अडथळे बहुतेक दूर केले त्यांनी.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघाचें मुखपत्र म्हणून एक मासिक काढावें, ही कल्पना पुढे मांडली मीच. कल्पनेचें पिल्लू सोडून देणें सोपें होतें; ती अमलांत आणणें महाकर्म कठीण होतें. पण सोपें—कठीण हा सवाल दिवाणजींच्यापाशी नव्हता. त्यांनी कंबर बांधली. आमच्या खटपटी सुरू झाल्या. पर्वतमहंमद न्यायाचा अवलंब करून आम्ही यवतमाळला कार्यकारी मंडळाची सभा भरविली व वामनराव देशपांड्यांच्या सारखा मोहरा गवसणींत घातला. सरकारची परवानगी मिळविणें, छपाईची व्यवस्था करणें, डिक्लेरेशन करणें, एक ना दोन हजार भानगडी! त्या सर्व निस्तरून अखेर मासिक उभें करून दाखविलें, तें कोणाच्या जोरावर? दिवाणजी सरचिटणीस नसते तर हें झालें असतें काय, असा प्रश्न मनाला विचारल्यास त्याचें एकच ठाम उत्तर येतें—'सुतराम् अशक्य'! पुढे 'युग-वाणी'च्या दुसऱ्या वर्षी अमरावतीचे प्रकाशक श्री. द. ना. टाकूर यांच्याकडे मुद्रण व प्रकाशन सोपविण्याचा करार घडवून आणण्यास दिवाणजींचेच परिश्रम मुख्यतया कार-णीभूत झाले होते. मी नागपुराहून दुसरी योजना जमवून आणली होती. पण दिवाण-जींना टाकुरांची योजना पसंत आहे असें दिसून येतांच मी माझी योजना आनंदाने मागे घेतली. मला असें स्मरतें आहे की मासिकाबाबत निश्चित योजना ठरविण्यासाठी श्री. टाकूर, वामनराव देशपांडे, दिवाणजी आणि मी पहाटेला तीन वाजेपर्यंत वाटाघाटी करीत बसलों होतों; कराराचा मसुदा दिवाणजींनीच लिहिला होता.

x x x

आणखी एक शकल, विदर्भसाहित्य संघाच्या परीक्षा सुरू करण्याची, मींच कार्यकारी मंडळापुढे मांडली. ती मंजूर करून तिचे सर्वाधिकार माझ्याकडे सोपविण्याच्या कामी दिवाणजींनीच पुढाकार घेतला होता. या परीक्षांच्या कामाची नीट शिस्त लावून दोन वर्षे तें काम मी कसेंबसें करूं शकलों याला कारण दिवाणजीच होते. त्यांनी आपली सरचिटणिशी न गाजवितां मला निर्वेधपणा लाभूं दिला. दुसरा एखादा किरकिऱ्या चिटणीस असता तर त्याने नाना तऱ्हेचे भुंगे माझ्यामागे लावून 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी माझी दशा करून सोडली असती. खरोखर मीं एका वर्षाकरितांच हें काम स्वीकारलें होतें व पहिल्या वर्षाअखेर तें सोडणार होतों. नारायणरावांच्याच आग्रहास्तव आणखी एक वर्ष मीं तें काम करण्याचें कबूल केलें.

x x x

गेल्या चार पांच वर्षांत पत्नीचें दुखणें, बंधूंचा बंदीवास, वडिलांचा आजार व मृत्यु इत्यादि अनेक कौटुंबिक संकटें नारायणरावांवर एकामागून एक येत गेलीं. एखादे वेळेस वैतागाची लहर त्यांनाहि मनास स्पर्श करून जात असे—पण ती किती! क्षणभरच! त्यांच्या आनंदी व उल्हासी वृत्तींत तशी कमतरता नव्हती. कौटुम्बिक संकटांची कांहीशी भरपाई बाह्य जगांतील त्यांच्या उत्कर्षाने झाली. शालापत्रकाच्या संपादकाच्या जागेवरून ते शिवाजी कॉलेजांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रोफेसर झाले, तेथून विदर्भमहाविद्यालयांत प्राध्यापक झाले, त्यांच्या गुणांचें चीज होण्यास नुकती कोठे सुरवात झाली होती !

साहित्य आणि रंगभूमि या दोन्ही क्षेत्रांतील सव्यसाचीपणामुळे आणि अलौकिक गोड व सहवासप्रिय स्वभावामुळे दिवाणजींचा मित्रपरिवार अफाट बनला होता. दिवाणजी म्हणजे साहित्यिकांचें विश्राम स्थान, दिवाणजी म्हणजे नाट्यप्रेमी मंडळींचा अड्डा, दिवाणजी म्हणजे अनेकानेक संस्थांचा केंद्रबिंदु, दिवाणजी म्हणजे साहित्यिक कार्यांचें उगमस्थान, दिवाणजी म्हणजे मित्रांच्या घोळक्याची आरामभूमि—असें महत्व अमरावतीत दिवाणजींना प्राप्त झालें होतें. त्यांच्या मृत्यूमुळे अमरावतीच्या सार्वजनिक जीवनांत जो भयंकर मोठा खड्डा पडला आहे तो लवकर भरून येणें दुरापास्त आहे.

x x x

अलीकडे दोन अडीच वर्षें मी स्वत: वर्तमानपत्राच्या खटाटोपांत आणि अनेक इतर विवंचनामध्ये गुंतल्यामुळे नारायरावांचा व माझा संबंध पूर्वीइतका घनदाट येईना. आंतरिक जिव्हाळ्यांत अंतर नव्हतें. त्यांचें मन तेवढ्यामुळेच व्यथित होत असे असें दिसे. " दादासाहेब, तुम्ही मजवरची माया पातळ केलीत, हें मला बरें वाटत नाही "—असे भेटीत ते बोलत व पत्रांतहि लिहीत. तसा कांहीच प्रकार नसल्याबद्दल मी त्यांना निक्षून सांगत असे व पत्रांतूनहि लिहीत असें. पण तीं पत्रें देखील त्रोटक असायचीं. त्यांचें त्यांनी समाधान होत नसे. त्यांचें पूर्ण समाधान करण्यासाठी मुद्दाम एकदा अमरावतीस जावें असें माझ्या मनांत अलीकडे फार येऊं लागलें होतें. पण ईश्वरी नेमानेम वेगळा होता. नारायणराव ! जेथे तुम्ही असाल, तेथून सूक्ष्म दृष्टीने माझ्या अंतःकरणांतला भाव जाणून घेऊं शकाल का ?

भारतीय भाषाध्यन मंदिर, नागपूर.

दुखवट्याचा ठराव

'विदर्भ साहित्य संघाचे' एक पदाधिकारी व 'वऱ्हाड शाला पत्रकाचे' भूतपूर्व संपादक प्रा. ना. कृ. दिवाणजी यांचा अकाली निधनाची वार्ता ऐकूण या मंदिरांतील सदस्य, शिक्षक आणि अधिकारी व्यथित झाले आहेत. प्रा. दिवाणजी हें विदर्भ साहित्य संघाशीं निकट संबंध असलेले प्रमुख कार्यवाह व 'विदर्भ महाविद्यालय' येथील ख्यातनाम प्राध्यापक होते.

नागपूरच्या 'ओरिअेन्टल कान्फरन्स'मध्यें झालेल्या 'स्वप्नवासवदत्त' ह्या संस्कृत नाटकाचें दिग्दर्शन त्यांनी केलें होतें हें अजूनहि पुष्कळांच्या स्मरणांत असेल. इतक्या अकालीं व तारुण्यांत त्यांच्या तरुण पत्नी, वडील व मुलें यांच्यावर दुर्दैवाचा अकस्मात् घाला पडला त्याबद्दल मंदिर त्यांच्या असीम शोकांत सहभागी आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शान्ति देवो !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्र द्धां ज लि

यशवंत खुशाल देशपांडे

☆

एखादा तारा क्षितिजावर यावा, त्याच्या स्वयंप्रकाशाकडे जनतेचें लक्ष वेधावें न वेधावें तोंच तो मध्यावर येण्यापूर्वी अचानकपणे निखळून पडावा असें प्रो. ना. कृ. दिवाणजी यांच्यासंबंधांत झालें—माझ्याप्रमाणे अनेकांच्या त्यांच्या संबंधी आकांक्षा होत्या, पण त्या पूर्ण व्हाव्या, असें विधिघटित नव्हतें.

नारायणरावांचा व माझा परिचय ते वऱ्हाडशाळापत्रकाचे संपादक असतांना घडला. माझ्यासारख्या भिन्नभिन्न विषयाच्या अभ्यासांत गुंतलेल्या अनियमित गृहस्थाकडून योग्य वेळी लेख लिहून घेण्याची त्यांची चिकाटी अवर्णनीय होती. त्यांच्या नियमित पत्रव्यवहारामुळे लेखणी हातीं घरणें अगदी अवश्यक होई. त्यांचा माझा दृढ परिचय विदर्भसाहिसंघात्याच्या कारभारामध्ये आला. त्यांची ती निरलस कार्यतत्परता, संघाच्या कार्याबद्दल अनन्यनिष्ठा, नवीन जोडलेल्या मित्रांशी सुद्धा अंगी रुजलेली आपुलकीची वागणूक, एकट्यावरच कामाचा बोजा पडला असला तरी काम करीत असतांना दिसून येणारी समाधानी वृत्ति इत्यादि त्यांच्या अंगी वसत असलेल्या गुणांची जाणीव निकट सानिध्यामुळे माझ्या दृग्गोचर झाली. प्रो. दादासाहेब बनहट्टी आणि त्यांचे सहकारी यांच्या मनांत विदर्भसाहित्यसंघाच्या पुनरुज्जीवनाची कल्पना आली ती यशस्वी करण्यास नारायणरावासारखा उत्साही आणि चिकाटीचा कार्यवाह जर मिळाला नसता तर ती कल्पना अमूर्त स्वरूपांतच राहिली असती, असें मला प्रांजलपणे वाटतें. विदर्भनाट्यमंडळाच्या कार्यास आलेलें स्वरूप नारायणरावांच्या परिश्रमाचें फळ होय.

असा हा कार्यक्षम, उत्साही आणि बहुगुणी तरूण अचानकपणे काळाचा भक्ष्य झाल्यामुळे विदर्भाच्या जनतेचें कधीहि भरून न निघणारें नुकसान झालें आहे. पण त्याहिपेक्षा या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या सर्व कुटुंबावर आकाशच कोसळलें आहे. आपल्या बेताच्या प्राप्तीतून संसाराचा गाडा रेटून आपल्या दोघा पुत्रांना शिक्षण देणारा म्हातारा, आपला मुलगा व्यवस्थित संसाराला लागला हें पाहून, ही दुर्दैवी घटना घडण्यापूर्वीच, इहलोकची यात्रा संपवून गेला, हें एकापरी बरेंच झालें असें वाटतें, पण नारायणरावांच्या वृद्ध मातुश्रीच्या दुःखमय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अंतःकरणाची कशी यथार्थ कल्पना येणार! वडील मुलगा कम्युनिझमच्या जाळ्यांत अडकून स्थानबद्ध झालेला, तरूण होतकरू आणि कुटुंबाचा एकमेव आधार असा दुसरा मुलगा ऐन उमेदींत नाहीसा झालेला, वयाप्रमाणे निराधार बनलेल्या कुटुंबाची हीनदशा, ही वृद्ध माता किती दिवस पाहूं शकेल! नारायणरावाला सुदैवाने लाभलेली सुविद्य पत्नि आपल्या पतीच्या सार्वजनीक कार्यांत उत्साहाने भाग घेत असे. संसारामध्ये गृहिणी या नात्याने संसाराचा बोजा शिरावर घेऊनहि ती व्यवहारदृष्टीने आर्थिक सहकार्यहि करावयास तत्पर असे. पण आतां नारायण-रावांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या निराधार बनलेल्या पत्नीच्या दुःखद परिस्थितीची कल्पनाहि भीषण आहे. येऊन पडलेल्या भीषण परिस्थितीशी तोंड देण्याचें सामर्थ्य देऊन निराधार झालेल्या लहानसहान अर्भकांचें परिपालन करावयाचें उदंड सामर्थ्य परमेश्वर त्यांना देवो अशी सदिच्छा प्रकट करण्याशिवाय दुसरें काय करूं शकणार!

★ काम करीत करीत विराम ★

के. ब. कदम.

प्राध्यापक दिवाणजी साहित्य संघाचे खरेखुरे 'दिवाण' होते—नव्हे प्रधान दिवाण होते. अलीकडे विदर्भ साहित्य संघाचे कार्य पुनरुज्जीवित होऊन जें अव्याहतपणे चाललें आहे त्याची दैनंदिन झळ त्यांनाच लागली होती.

आम्ही आर्वीकर तर त्यांची चातकाप्रमाणे वाट पहात होतों. साहित्य संघा-च्या कार्यासाठी ते येथे येणार म्हणून पत्रद्वारे त्यांनी कळविलेंहि होतें. त्यांच्या स्वागताची पूर्वतयारी म्हणून गेल्या पितृमोक्षअमावास्येला येथील सुप्रसिद्ध लोकमान्य वाचनालयाच्या दिवाणखान्यांत साहित्य संघाचा परिचय करून देण्यासाठी साहित्य-प्रेमी जनांची सभाहि घेतली होती व आमच्या दिवाणखान्यात येऊन दिवाणजी आम्हांस अधिकृतपणे चार शद्ब सांगतील अशी आम्हांस आशा वाटत होती. पण क्रूर काळाने अनपेक्षितपणे आमची कायमची निराशा केली. इतक्या अल्पावधीत त्यांनी आपल्या जीवनाचा ग्रंथ आटोपला.

साहित्यप्रचार व समाजशिक्षण हीं दोनहि त्यांनी अंगिकृत केलेलीं कार्ये अपुरींच राहिलीं. पण समाजशिक्षणप्रचारमोहिमेंत त्यांचा देह पडला. असें स्पृहणीय मरण त्यांना आलें. हें पवित्र कार्य करतां करतां त्यांचा आत्मा निजधामास गेला.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यात्रा अशी संपली!

वा. वि. मिराशी

☆

प्राध्यापक दिवाणजी यांचा व माझा परिचय ती वर्षांपूर्वी नागपूरच्या प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनप्रसंगी प्रथम झाला. त्यावेळी स्वागतमंडळाने संस्कृत कवि भास याच्या 'स्वप्नवासवदत्त' नाटकाचा प्रयोग करावयाचें ठरविलें होतें. त्याकरितां प्रा. दिवाणजीनी अत्यंत परिश्रम घेतले. त्या नाटकाच्या तालमीकरितां ते मुद्दाम कित्येक दिवस नागपुरास येऊन राहिले व योग्य दिग्दर्शन करून त्यांनी त्या नाटकाचा प्रयोग इतका उत्कृष्ट वठविला की त्यापूर्वी अनेक प्रांतांत झालेल्या प्राच्यविद्यापरिषदेच्या कोणत्याहि अधिवेशनांत संस्कृत नाटकाचा या तऱ्हेचा प्रयोग झाला नाही असे प्रशंसोद्गार परिषदेस नेहमी उपस्थित राहणाऱ्या अनेक प्रतिनिधींनी काढले. परिषदेचे अध्यक्ष म. म. पां. वा. काणे यांनीहि त्या प्रसंगीच्या आपल्या भाषणांत प्रा. दिवाणजींचा यथोचित शब्दांनी गौरव केला.

तीन वर्षांपूर्वी माझी अमरावतीस बदली झाल्यावर प्रा. दिवाणजी यांच्याशी माझा जास्त परिचय झाला व गतवर्षी ते विदर्भमहाविद्यालयांत प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले तेव्हापासून तर तो घनिष्ठ झाला. श्री. दिवाणजी सदैव उत्साही, कार्यतत्पर व स्मितमुख असत. नाट्य व गायन यांचा त्यांना अत्यंत शौक होता. कोणत्याहि संस्थेच्या संमेलनांत कोठेहि नाटक असो, त्याकरितां पाचारण करतांच दिवाणजी मदत करण्यास सदैव तयार असत.

अलीकडे त्यांनी समाजशिक्षणकार्यांत विशेष लक्ष घातलें होतें. गेल्या उन्हाळ्यांत समाजशिक्षणाच्या एका केंद्रांत त्यांनी उत्कृष्ट काम करून इतकी लोकप्रियता मिळविली की शेवटी त्यांना निरोप देण्याकरितां त्या व आसपासच्या गांवच्या लोकांनी त्यांची दोन मैल सवाद्य मिरवणूक काढली.

समाजशिक्षणाच्या कार्यांत कीर्तनाचा लोकजागृतीकरितां उत्तम उपयोग करतां येतो हें जाणून त्यांनी 'दारूबंदी' 'अधिकधान्योत्पादन' इत्यादि प्रचलित प्रश्नांवर स्वत: आख्यानें रचलीं होतीं. कवित्व व गायनकला ही त्यांना उत्तम येत असल्यानें त्यांच्या कीर्तनास चांगला रंग चढत असे. गेल्या ऑक्टोबर महिन्यांतील गोष्ट. अमरावती जिल्ह्यांतील समाजशिक्षणाचे संचालक श्री. भेंडे यांनी करजगांव येथे रात्री श्री. दिवाणजी यांचें कीर्तन करण्याचें ठरविलें.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याकरितां विदर्भमहाविद्यालयांतील कांही प्राध्यापक मंडळीसह मीहि गेलों होतों. कीर्तन रात्री नऊ वाजतां होईल असें जाहीर झालें. तें जेथे होणार त्या जागे-जवळच एक फिरती सिनेमाकंपनी अगोदरच तळ देऊन बसली होती व तिनेहि सिनेमाची तीच वेळ जाहीर केली होती. तेव्हा दिवाणजींच्या कीर्तनास त्या रात्री कितीसा समाज जमेल याविषयी आम्ही साशंक होतों व निदान कीर्तनाची जागा बदलावी अशी कित्येकांनी त्यांना सूचना केली. पण दिवाणजींनी आत्म-विश्वासाने सांगितलें की माझें कीर्तन सुरू झाल्यावर सिनेमाचा तंबू ओस पडेल. आणि झालेंहि तसेंच. श्री. दिवाणजींनी 'अधिक धान्य पिकवा' या विषयावर स्वतः रचलेलें साग्रता माळयाचें आख्यान लावून व त्यांत विविध प्रसंगांची, अभंगांची व गेय पद्यांची गुंफण करून इतकी बहार केली की तेथे जमलेला समाज त्यामध्ये अगदी गुंग होऊन गेला. त्यांचें कीर्तन दोन तास चाललें होतें. मधून मधून क्वचित् कोठे गडबड होईल असें दिसूं लागल्यास ते स्वतःविषयीची एखादी गोष्ट विनोदपूर्ण भाषेत सांगून श्रोत्यांचें मन आकृष्ट करीत. त्यांची ती समयोचित वृत्ती पाहून ते कोणत्याहि श्रोतृसमाजावर छाप बसवितील याची मला खात्री पटली. त्याच दिवशी श्री. भटे यांच्या विनंतीवरून बहिरमच्या यात्रेच्या प्रसंगी मोठ्या जनसमूहासमोर कीर्तन करण्याचें श्री दिवाणजींनी ठरविलें. पण दुर्दैवाने त्या यात्रेला जाण्याच्या मार्गावरच निर्घृण काळाने उभयतांवर झडप घातली. त्यांच्या अकाली निधनाने देशाचें अपरिमित नुकसान झालें आहे.

आसवांवांचुनी काय आपुल्या हातीं ?

आसवांवाचुनी काय आपुल्या हातीं ? ॥ धृ० ॥

क्षणभरांत झाली देहाची हो माती ॥
लागली न मरणा तुझी मुळीं चाहूल,
भासतें लागलें जणु यमाला खूळ,
दरवळे गंध ना तोंच गळालें फूल,
तेवती विझाली अवचित जीवन-ज्योती १.
दिसतसे स्मिताची लकेर डोळ्यांपुढतीं,
निष्पाप, मोकळीं हास्यें तीं आठवतीं,
नी श्रवणीं अमुच्या शब्द तेच घुटमळती,
घेऊन चालता झाला अमुची प्रीती २.
गे रंगदेवते ! पैंजण पायातील,
निखळला, आसवें पूस ! कुणी पाहील,
सांगना सखे तव कोण गान गाईल ?
नाचेल रंगुनी कोण तुझ्या सेवेशी ? ३.

सुरेश भट.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचित्र विधिघटिता !

भि. गो. देशपांडे

☆

"मृत्यु यावा तर तो कै. साहित्यसम्राट् केळकरांच्या मृत्यूसारखा अनपेक्षित व सुखद."

कै. ना. कृ. दिवाणजी.

प्रिय मित्र नारायणराव दिवाणजींच्या अपघाती मृत्यूची हृदयविदारक वार्ता माझ्या कानीं येतांच मला त्यांच्या वर उधृत केलेल्या उद्गारांची अकस्मात् आठवण झाली. १९४७ च्या नोव्हेंबर महिन्यांतील शेवटच्या शुक्रवारी अमरावतीच्या विदर्भमहाविद्यालयांत "कै साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांची साहित्य-स्मृति" या विषयावर उद्बोधक "परिसंवाद" झाला. दिवाणजी हे जात्याच नाटककार व अभिनय कुशल असल्यामुळे "नाटककार केळकर" या विषयावर त्यांनी रसग्राही भाषण केलें. परिसंवाद संपल्यावर सायंकाळीं पांच वाजता मोटारींतून आम्ही शहराकडे येत होतों. मध्येच सिगरेटचे झुरके घेत दिवाणजी म्हणाले " मृत्यु यावा तर तो केळकरांच्या मृत्यूसारखा अनपेक्षित व सुखद. " मी म्हटलें केळकरांचा मृत्यु सुखद होता परंतु अनपेक्षित नव्हता. कारण त्यांनी मृत्युसंबंधी हाक कविता रचली व मग ते स्वेच्छेने मृत्यू-निद्रेत विलीन झाले.

काय हा दुष्ट योगायोग ! बरोबर दोन वर्षांनंतर, त्याच नोव्हेंबर महिन्यांत, त्याच दिवशी, त्याच वेळीं व त्याच मोटारीच्या वाहनांत, दुसऱ्या मित्रांबरोबर गप्पा करण्यात गुंग असतांना प्रिय नारायणरावांना निर्दय मृत्यूच्या जबड्यांत अनपेक्षितपणे पडावें लागलें. आम्ही शेक्स्पिअरची "सीझर" शोकान्तिका वाचतांना "Dramatic Irony" चा रसास्वाद घेतों. परंतु या "Cruel Factual Irony" चा दाहक अनुभव घेण्याचा दुःसह प्रसंग आमच्या लोकप्रिय, सुजन, आदरातिथ्यशील, सेवातत्पर, व उदयोन्मुख नाटककार साहित्यिक मित्राच्या, वाटतीस यावा ही गोष्ट कल्पनातीत आहे. नियति ही शोकपूर्ण काव्यनाट्यांपेक्षा जास्त अद्भूत घटनांची घटक आहे, व तो नियतिनिर्माता जगच्चालक कोणत्याहि कल्पनाबाज नाटककारापेक्षा जास्त कल्पक नाटककार आहे. म्हणून त्या विश्वेशाला मी एवढीच नम्र प्रार्थना करतों की प्रिय नारायणरावजींच्या आत्म्याला   ति दे व नारायणरावजींची सुजनता व साहित्यसेवेची तत्परता आमच्यांत निर्माण होऊं दे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हें खरें जीवन

वि. भि. कोळते

☆

श्री. नारायणराव दिवाणजी यांच्याविषयी काय व कसे लिहावे हेच कळत नाही. कारण, त्यांना अपघात होऊन मृत्यु आला या घटनेवर विश्वास ठेवावासे मनाला अजून वाटतच नाही. ता. २५ रोजी दुपारी साडेअकरा-बारा वाजता चांद्याच्या संमेलनासंबंधी मला त्यांचे पत्र आले आणि अर्ध्यापाउण तासाच्या आंत प्रा. वामनराव चोरघड्यांनी त्यांच्या अपमृत्यूची बातमी मला फोनवरून सांगितली. त्यावेळी तिच्यावर विश्वास ठेवणे जसे अशक्य वाटले तसेच अजूनहि वाटत आहे. मला तर वारंवार असा भास होतो की नारायणराव आपल्या डाव्या हाताच्या मधल्या दोन बोटात जळती सिगारेट धरून, मधून मधून तिचे झुरके घेत घेत उजव्या हाताने विदर्भसाहित्य संघाच्या चांदा येथील अधिवेशनाविषयी अनेकांना भराभर पत्रे लिहीत आहेत....पत्रके काढीत आहेत...

होय. अलीकडे विदर्भसाहित्यसंघाला नारायणरावांनी सर्वस्वाने वाहून घेतले होते. आणि यातच त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य उत्तम रीतीने दिसून येते. अंगावर घेतलेले कोणतेहि कार्य निरलसपणे व प्रामाणिकपणे पार पाडणे हे ते आपले कर्तव्यकर्म समजत. त्यासाठी ते तळमळत असत, प्राण पाखडीत असत. वनिता मंडळामधील मुलींना विद्येबरोबर कवायत शिकवतांना, कॉलेजमधील मराठी वाङ्मयमंडळाचे कार्यक्रम उरकतांना, वऱ्हाड शाळापत्रकाचे संपादन करतांना, मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सव पार पाडतांना, वि. सा. संघाची अधिवेशने यशस्वीपणे साजरी व्हावी म्हणून काम करतांना—त्यांची कोण धांदल चाललेली आहे हे मी स्वतः पाहिले आहे, अनुभवले आहे. उमरावतीतलि कोणत्याहि शाळा कॉलेजातील स्नेहसंमेलनप्रसंगीचे नाटक बसवण्यासाठी नारायणराव दिवाणजी नाहीत असे सहसा व्हायचे नाही. वाङ्मयाप्रमाणेच गायन, वादन, नाट्य या ललितकलांचा त्यांना फार शौक होता. त्यांच्याबरोबर गायनाच्या अनेक बैठकी मी ऐकल्या आहेत, अनेक नाटके पाहिली आहेत, इतकेच नव्हे तर केवळ त्यांच्याच आग्रहामुळे तोंडाला रंग फासून रंगभूमीवर वावरलोहि आहे. त्यांच्या अपूर्व उत्साहामुळेच उमरावती येथे मराठी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव, महाराष्ट्रांत इतर कोठेहि झाला नसेल इतक्या चांगल्या रीतीने पार पडला.—पण आता या गोष्टी आठवायच्या इतकेच! कारण नारायणरावांची ती उत्साहमूर्ति गेली आणि उमरावतीत या ललितकलांचा जणु प्राण नाहीसा झाला. त्यांना काम करता ना पाहून मला नेहमी वाटायचे की हे खरे जविन आहे! नारायणरावांच्या दृष्टीने जीवन म्हणजे अखंड तळमळ, जीवन म्हणजे निरलस उद्योग हे समीकरणच जणु ठरून गेले होते. असे चैतनामय जीवन ते जगले आणि ते जीवन जगता जगताच समाजसेवेचा आणि समाज शिक्षणाचा एक उदात्त आदर्श तरुणांसमोर ठेवून ते शाश्वतात विलीन झाले.

प्रणाम

जाता तर जा खुशाल आता! प्रणाम घ्यापरि शेवटला
हृदयींच्या नवभावांचा हा भक्तिरसाने भरलेला!
तुटे आतडे जीव तडफडे अश्रुबिंदु नेत्रीं जमले
'दिवाणजी हा प्रणाम घ्याहो!' शद्ब मुखीचे मुखि विरले!

महाराष्ट्राच्या रंगभूमिच्या सक्रियतेच्या साह्यवरा
तोडुनी माया कुठे चालला गोविंदाग्रज शिष्यवरा!
लखलख चंदेरी तेजाचा एकमेव तूं मुकुटमणि
प्राणहि अर्पुनि सत्कर्मास्तव अमर जाहला या भुवनी

स्फुंदस्फुंदुनी रडतो किति हा विद्यार्थी-गण मराठिचा
अहो आटला झरा स्फूर्तिचा अन्नदरिद्रि जनतेचा
प्रभो! याजला शांतिनिधानीं शाश्वतभुवनीं शांती द्या
'दिवाणजी, हा प्रणाम घ्याहो!' समाधान हें लाभूं द्या!

—अच्युत केशव पांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्याचें त्याला समर्पण

☆

प्रियमित्र नारायणराव,

"हेवा करण्यासारखं आकास्मिक मरण मरण्यापूर्वी निदान कांही दिवस आजारी तर पडायचं होतं?"—तुमच्या मृत्यूची वार्ता दिल्ली येथे प्रथम 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये एका दुर्दैवी सकाळी चहा पितां पितां वाचली, हातांतील वर्तमानपत्र गळून पडलें आणि वरील विचार पहिल्यांदा मनांत आला. खरोखर, तुम्ही थोडी जरी मरणाची पूर्वकल्पना दिली असती अगर तशी ती मनांत आली असती तर त्या अवधींत कितीतरी जिवाभावाच्या गोष्टी बोलून टाकल्या असत्या. तुमची प्राणज्योत विझून गेली पण आमच्या गोष्टी तशाच राहिल्या!

राहिल्या तर राहिल्या पण त्या तुम्हालाच कधीतरी सांगायच्या होत्या, सुचवायच्या होत्या, मन हलकें करायचें होतें. तुम्ही कायमचे गेलां असं पुष्कळदा वाटतच नाही. उलट, वाटतें तुम्ही तुमच्या मित्रपरिवारांतच आहां, म्हणूनच आज हें "ज्याचें त्याला समर्पण!

तुमच्या सहवासांत या गोष्टींची इतकी जाणीव होत नसे. पण आतां पूर्णपणे कळलें की तुमच्या मृत्यूने तुमच्या निकटवर्ती मित्रपरिवाराला एवढा चटका लागण्याचें कारण तुमचा दिलखुलास आनंदी स्वभाव. आणि त्याचा स्थायीभाव म्हणजे प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा तुमचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोण. तुमच्या मृत्यूमुळे विदर्भसाहित्याचें आणि विशेषतः मराठी रंगभूमीचें फार नुकसान झालें असेल; पण सर्वांत अधिक व कधीहि भरून न निघण्यासारखी हानि तुमच्या मित्रपरिवाराची झाली आहे. साहित्यांत काय किंवा मैत्रींत काय वस्तुनिष्ठा हीच माणसाला अलिप्तता शिकविते व विशेषेकरून मित्रपरिवारांत तुमच्यासारखा माणूस कधीहि अप्रिय होत नाही. तुम्ही आत्मस्तुति आणि परनिंदा यांचा संपर्क देखील कधी मनाला लागूं दिला नाही यांतलें खरें इंगित तुमची वस्तुनिष्ठ अलिप्तता हीच होय.

'पद्मपत्रमिवांभसि' अशा अलिप्त स्वभावाची व्यक्ति नेहमी समाधानी व आनंदी असेलच असें नाही. एकंदरीने तुमच्यासारखा मनमोकळा व दिलदार

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मित्र दुर्मीळच. अशा वृत्तीचें महत्व त्या व्यक्तीच्या सहवासांत तेवढें कळून येत नाही. म्हणूनच 'अतिपरिचय खोटा ' असें म्हटलें असावें. पण तुमच्या मित्र-समुदायांत तुमच्याइतका प्रेमळ पण दिलदार असा अन्य नव्हताच त्यामुळे 'अति'परिचयाचा संभवहि आला नाही.

औपचारिकपणाचा अभाव हा एक तुमचा दुसरा विशेष होता. आपल्या परिसरांत सुहृद्भाव वाढविण्याची तुमची अशी कांही अजब शैली होती की तींत उपचारांचा प्रश्नच येत नसे. दुसऱ्यांचें कशाला, खुद्द माझीच आठवण सांगतों. विदर्भसाहित्यसंघाचा अध्यक्ष म्हणून माझी निवडणूक झाली असतां किंवा दिल्लीच्या भाषातज्ज्ञ परिषदेवर नेमणूक झाली असतां तुम्ही कांही माझें कधी शाब्दिक अभिनंदन केलें नाही. तशी अपेक्षाहि नव्हती. पण तुमच्या सूचक हालचाली, तुटक शब्द व रोचक उपहार यावरून मनोमन खात्री झाली की तुम्ही परगुणांचे पर्वत करणारे आहां व या दोन्ही वेळी तुमच्याइतका ओतप्रोत संतोष दुसऱ्या कुणालाच झाला नाही !

तुमच्या वागण्यांत कधीं नाटक नसायचें; पण नाटकांतील एकहि अंग असें नाही की तुम्ही ज्याला भूषविलें नाही. तुम्ही काव्यालंकाराचे मोठे मर्मज्ञ होतां हें फार थोड्यांना माहीत असेल. सभाधीटपणा, व वक्तृत्व, विषय-प्रतिपादनाची हातोटी, संपादन-कौशल्य, मुद्रणकलेतील बारकाव्याची माहिती अशा किती म्हणून गुणांची यादी द्यावी व त्यांचा कुणाला प्रत्यय आला नाही ?

' मित्रं प्रीतिरसायनं नयनोरानन्दनं चेतसः ' ही त्या महाकवीची उक्ति तुम्हाला किती छान शोभून दिसे ! पण आता ? आता काय, त्याच्याच शब्दांत—ते हि नो दिवसा गताः । तुमच्या सर्व मधुर स्मृति कितीहि सुखद असल्या तरी आज असें कांही बेचैन वाटतें की नको त्या तुमच्या आठवणी काढून उगाळीत बसणें ! मृत्यूने ही विलक्षणच काळवेळ योजली !

दिल्लीहून आल्यावर तुमच्या मुलाबाळांना व पत्नीला भेटण्यासाठी म्हणून गेलों. जातांना पाय लटपटूं लागले. जाऊन बसल्यावर कांही हुंदके ऐकूं आल्याचा भास झाला. तुमची ' भार्या गृहद्वारि ' दिसली. पण कारुण्यापेक्षा गांभीर्याचीच मूर्ति बनलेली ती वहिनी ! कानांवर शब्दध्वनि आले " डॉक्टर, तुम्ही आल्याचें पाहिल्याबरोबर 'ह्यांना' सांगण्यासाठी आंत जाणार होतें...पाहा, हे गेले हें लक्ष्यांतच राहत नाही कित्येकदां ! "

नारायणराव, यावेळी वहिनी अगदी ओक्साबोक्सी रडली असती तरी चाललें असतें. पण तें भीषण गांभीर्य हें शेवटचें पत्र इथेंच पुरें करायला लावतें.

तुमचा स्नेहांकित,
माधव गोपाळ देशमुख.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काकांचे दिवाणजी

का का स ह स्र बु द्धे

✻

'वामनरावां'चा आदेश आला, 'युगवाणी'साठीं दिवाणजींच्या आठवणी पाठवा. सर्वांग झिणझिणलें! दिवाणजींच्या आठवणी! आणि त्या काकांनी लिहावयाच्या! ही कळीकाळाची उफराटी वेळा कशी आली? ही उलटी गंगा कशी वाहूं लागली? वळचणीचें पाणी कधीं आढ्याकडे गेलें आहे कांहो? काकांच्या घरच्या चुलीपर्यंत ज्या नारायणरावांना तिन्ही त्रिकाळ मुक्तद्वार आणि काकांना ज्या नारायणरावांच्या घरीं मानाचा पहिला पाट, त्या नारायणरावांच्या आठवणी तरी किती लिहूं? आठवणी लिहिण्यासाठी कोणती दिव्य शक्ति आणूं? आणि खरोखरच नारायणरावांची आठवण झाली म्हणजे त्यांचें सगळें भकास घर खायला धांवतें! कलल्या कळसाचा विदर्भसाहित्यसंघ डोळ्यापुढे उभा राहातो आणि आतां अनाथागत पडलेलें केविलवाणें विदर्भनाट्यमंदिर मनाचें पाणी-पाणी करतें!

या सगळ्या संस्थांमध्ये नारायणरावांनी या काकाला जीवतोडीने ओढून घेतलें होतें. अमरावती येथील शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवापर्यंत काका कोणाला माहितहि नव्हता, तो नारायणरावानीच त्याला शेंदूर फासून मोठा करून विदर्भ-नाट्यमंदिरांतील देव म्हणून सगळ्यांना दाखविला! आणि म्हणून वाटतें की नारायणरावांचा लहानगा 'मुकुंदा' आज ना उद्यां—केव्हातरी आपल्या घराचे पांग नारायणरावांच्या सवाईने फेडील; विदर्भसाहित्यसंघ वा युगवाणी यांचें लालन-पालन नारायणरावांच्या जिव्हाळ्याने जरी नाही तरी त्यांच्या जिव्हाळ्यासाठी म्हणून तरी कोणी पुढे होऊन कसें तरी होईलच? पण आमच्या विदर्भनाट्य-मंदिराचें नारायणरावांच्या मागे कसें होणार? आणि काय होणार?

नाही हो, नारायणरावांच्या पश्चात् विदर्भनाट्यमंदिराची धडगत दिसत नाही! त्याला कोणी वाली नाही हो! पुष्कळांना वाटतें काका म्हणजे विदर्भनाट्य-मंदिर! पण त्यांना माहीत नाही की काकांच्या जड देहांतील जीव दिवाणजी होते! विदर्भनाट्यमंदिराचा 'बोलविता धनी' नारायणराव होते! विदर्भनाट्यमंदिराचें नाटक नारायणरावांनी ठरवावयाचें आणि काकांनी त्याचें फक्त दिग्दर्शन करावयाचें! म्हणजे काकांचा मार्गदर्शक नारायणराव होते! गेल्या वर्षी विदर्भ-साहित्यसंघाच्या मदतीसाठी विदर्भनाट्यमंदिराचें "आग्र्याहून सुटका" हें नाटक

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अमरावती-नागपुरास केलें; त्यावेळच्या नारायणरावांच्या रोमरोमांतून ओसंडणारा उफळता उत्साह आजहि डोळ्यापुढे दिसतो आहे! कारण विदर्भसाहित्यसंघ आणि विदर्भनाट्यमंदिर दोन्ही संस्थांचे चिटणीस नारायणरावच! आणि दोन्ही संस्थांचे त्यावेळचे अध्यक्षहि एकच—डॉ. कोलते! त्यावेळची नारायणरावांची सर्वांगीण कामगिरी दृष्टीआगळी होत नाही! एवढा मोटा पदवीधर विद्वान् आणि अधिकारी प्राध्यापक; पण नाटकाचे आदले रात्री सारखा चार तास मोटारीतून लाऊडस्पीकरवर अक्षरशः घसाफोडीने गांवभर नाटकाची प्रसिद्धि करीत होता! अशा तऱ्हेच्या जिवाभावाचें लेणें आता विदर्भनाट्यमंदिरावर कोण चढविणार? नारायणरावांच्या आपुलकीने त्याच्याकडे कोणी आतां पाहील कां? विदर्भनाट्य-मंदिराचें उमललेंले फूल देवानें खुडून घेऊन मस्तकी धारण केलें! आता वाळून-गळून जाण्याशिवाय पिकल्या पानाकडे कोणतें कर्तव्य उरणार? आणि फुलेंच गेल्यावर नुसत्या देटाला धरून बसून जीव कंठण्यात पिकल्या पानाला तरी काय स्वारस्य वाटणार!

विदर्भ नाट्यमंदिर, अमरावती तर्फे कै. प्रा. ना. कृ दिवाणजी, आद्य मंत्री, वि. ना. मंदिर यांचे छायाचित्राचा अनावरण समारंभ, त्यांच्या द्वितीय मासिक स्मृतिदिनीं दि. २५ जानेवारी बुधवार रोजीं सायंकाळीं सहा वाजतां अमरावती येथे डॉ. जोशी सभागृहांत डॉ. मा. गो. देशमुख, श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, महामहोपाध्याय प्रि. वा. वि. मिराशी, जोध वकील, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, दादा-साहेब फडके व काकासाहेब सहस्रबुद्धे यांच्या कै. दिवाणजी संबंधी गुणगौरवपूर्ण स्मृतिभाषणांनी वीर वामनराव दादा जोशी यांच्या हस्ते मोठ्या थाटाने झाला.

सदहू प्रसंगीं डॉ. मा. गो. देशमुख, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ यांनी कै. दिवाणजींच्या छायाचित्राला संघातर्फे पुष्पहार समर्पण केला. विदर्भ नाट्यमंदिर आणि विदर्भ साहित्यसंघ या भगिनी संस्था व दोहींचे आद्यमंत्री कै. दिवाणजी! मग वि. ना. मंदिराच्या कै. दिवाणजीविषयक कळकळीच्या कार्यात वि. सा. संघाने बरोबरीच्या जिव्हाळ्याने भाग घेतला, हा कै. दिवाणजींच्या कार्याचा प्रीतिसंगमच म्हणावयाचा!

अशाच तऱ्हेचा कै. दिवाणजींच्या छायाचित्राचा दुसरा अनावरण समारंभ अमरावती येथील विदर्भ महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या रौप्य महोत्सव प्रसंगीं दि. २२ जानेवारी रोजीं सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ना. सी. फडके यांच्या हस्ते झाला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आठवणी मात्र राहिल्या

पद्माकर नीमदेव

☆

पानांआड दडलेलें गुलाबाचें फूल आपल्या दृष्टीस पडत नाही, पण त्याचा सुमधुर सुवास मात्र आपणांस येत असतो; तशीच स्थिति माझे निकट स्नेही कै. नारायणराव दिवाणजी यांचे बाबतीत झाली आहे. आज ते दिसत नाहीत, ते काळाच्या पडद्याआड गेले; पण त्यांच्या स्मृति आणि आठवणी या मात्र डोळ्यांसमोर गर्दी करून येतात.

मराठी शाळेपासून जे आम्ही एकाच वर्गात होतों ते अगदी बी. ए. होईपर्यंत. नारायणराव हे पूर्वीपासूनच दुसऱ्याशी गोडीगुलाबीने वागणारे. त्यांच्यातील लेखनगुण आम्हाला हायस्कूलमध्येच असतांना प्रत्ययास आले. मॅट्रिकमध्ये असतांना मला वाटतें, त्यांनी केलेली कविता—ओ गॉड अवर हेल्पचा अनुवाद आमच्या हायस्कूलच्या 'विद्यामंदिर' नांवाच्या नियतकालिकांत छापून आला. त्यानंतर त्यांच्या बऱ्याचशा कविता, मौज, स्वच्छंद, स्त्री, झारापकर, भगिनी इ. नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या. नारायणरावांना मी प्रथम कवि म्हणून ओळखतों. कवित्वाबरोबरच त्यांच्या अंगी नाटककाराचेहि गुण होते. ते शीघ्रकवि होते. कॉलेजांतून मोर्शी रोडने आम्ही येत असता, वाटेंत त्यांना आम्ही म्हणावें, कविता म्हणा बुवा—आणि काय आश्चर्य, त्यांनी लगेच छोटीशी कविता करून ती म्हणून दाखवावी. कॉलेजांत असतांना त्यांनी अशी फुटकळ काव्यें कित्येक केलीं. त्यांच्या अंगी संपादकत्वाचे गुण होते, हें अगदी प्रथम त्यांनी १९३७ साली 'साहित्य-सेवक' नांवाचें हस्तलिखित संपादन करून दाखविलें. त्या वर्षीचा 'साहित्य सेवकां'चा अंक अजूनहि कुणी पाहिला तर माझ्या म्हणण्याची साक्ष पटेल. त्यांनी संपादित केलेले 'वऱ्हाड शाळा पत्रका'चे अंक पाहणारास ही गोष्ट सहज दिसून येईल.

कॉलेजांत शिकत असतानाच त्यांनी नाटकें लिहिलीं व बसविलीं सुद्धा. "सैतान", "ऐन बोहल्यावर", "सुनेचा सांपळा", "राजकन्या पद्मावती", हीं त्यांचीं छोटीं नाटकें आहेत. ज्या किंग एडवर्ड कॉलेजांत ते डॉ. कोलते यांचे हाताखाली काव्यात्मक 'मराठी' शिकले, तशाच तऱ्हेने 'मराठी' शिकविण्याचा योग त्याच कॉलेजांत त्यांना लाभला. पण तो अल्पकालिक टिकला.

नारायणराव हे 'उत्सवमूर्ति' होते. नाटकाचें त्यांना इतकें 'वेड' होतें की त्यापुढे त्यांना घर, मुलें, स्वतःची प्रकृति यांचें जणू भानच राहत नसे.

प्रेमळ मित्र, कळकळीचा कार्यकर्ता, निःस्वार्थी वृत्तीचा मेहनती असा हा आमचा मित्र गेला ! आठवणी मात्र राहिल्या !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मित्रं प्रीतिरसायनम्

ग. त्र्यं. देशपांडे

☆

"मित्र म्हणजे, नेत्रांचें प्रीतिरसायन, चित्ताचा आनंद", असें एक संस्कृत कवि म्हणतो. नारायणरावांच्या बाबतींत हें किती सत्य आहे !

नारायणरावांचा आणि माझा परिचय सात आठ वर्षापासूनचा आहे. कां कोणाला ठाऊक, पण या पांच सात वर्षांत आमचा स्नेह अधिकाधिक वाढत होता खरा. तसें पाहिलें, तर त्यांच्या आणि माझ्या स्वभावांत बराच फरक. ते जितके आनंदी, तितकाच मी नेहमी गंभीर चेहरा करून बसणारा ! त्यांना मित्रांचा घोळका जमवण्याची हौस, तर मी पडलों एकलकोंडा. त्यांची नेहमीची धडपड, घाई, त्यांना क्षणाचीहि उसंत नाही; तर मी मुलखाचा आळशी, धीमा; वेळ कसा घालवावा हेंच कळण्याची मला मारामार. त्यांची वाङ्मयीन धाव तेराव्या शतकापासून अलीकडे, तर मी धावणार शकपूर्व काळांत. कशाचा कशाशी संबंध नाही. मेलगाडी आणि मालगाडी यांचें जमावें कसें ? पण जमलें खरें. "न खलु गुणविशेषः प्रेमबन्ध प्रयोगे" हेंच खरें आहे !

*

उमरावतीस शिवाजी कॉलेज निघालें. आमचा इंटरव्ह्यू झाला. काय निकाल लागतो याबद्दलची उत्कंठा होती. अखेर आमची निवड झाल्याचीं पत्रें आलीं. जवळपास धावतच ते माझ्याकडे आले. मला पाहिल्या बरोबर 'अहो प्राध्यापक !' म्हणून त्यांनी हाक मारली आणि कडकडून भेटले. त्यांच्या डोळ्यांतून सांडणाऱ्या त्यावेळच्या आनंदाचा ताजेपणा मला अजूनहि जशाचा तसा दिसत आहे !

*

या वर्षीच्या आमच्या स्नेहसंमेलनांत आम्ही भासकृत 'पंचरात्रम्' हें संस्कृत नाटक केलें. शेवटल्या तीन चार दिवसांत नारायणरावांना मीं बोलाविलें होतें. त्यांनी अगदी जिवापाड मेहनत घेतली. पण नाटकाच्या दिवशीचा प्रसंग कांही वेगळाच आहे. त्या दिवशी नारायणरावांना मीं सांगितलें कीं तुम्ही प्रेक्षकांत बसावें. अमरावतीतील रसिक, नाट्यप्रेमी लोकांनी प्रेक्षकांत बसून हा संस्कृत नाट्यप्रयोग कसा होतो हें पहावें. त्याप्रमाणे त्यांनी कबूल केलें. इकडे आमची नट मंडळी तयार होत होती. अमरावतींत संपूर्ण संस्कृत नाटक असें हें पहिलेंच होत असल्याने विकार गर्दी होती. मी ग्रीनरूममध्ये होतों. इतक्यांत मला कळलें, आमचा सूत्रधार तापाने पडला म्हणून. प्रा. व्यवहारे आणि बेत्री व्यवहारे यांच्या अंगांत अगोदरच ताप होता. आता काय करावें या विवंचनेंत असतानाच, अभिमन्यूचें काम करणाऱ्या मुलाला ओकाऱ्या होऊं लागल्या. मला कांहीच सुचेना. बाहेर गर्दी, वेळ बराच झालेला, संस्कृताविषयी अगोदरच नैराश्य, कसें तरी हें नाटक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उभें केलें तों वेळेवर ह्या आपत्ति! सगळीकडून गोंधळच गोंधळ! मी तेथेच एका पेटीवर बसलों, कांहींच सुचेना. इतक्यांत नारायणराव ग्रीनरूममध्ये आले, आणि म्हणाले, "अहो, आणखी किती वेळ करता! नाटक दाखवता की नाही?"

मी त्यांना सर्व परिस्थिति सांगितली व म्हटलें, "नाटक होत नाही असें मी आता जाहीर करतों." त्यावर नारायणराव म्हणतात, "छे! हें भलतेंच काय करतां! नाटक झालेंच पाहिजे. अहो, हा तुमचा अभिमन्यु ओकतो आहे ना! याला कपडेवगैरे घालून निजवून ठेवा. अगदी वेळेवर त्याला स्टेजवर आणा. मी तुम्हाला सांगतों, हा स्टेजवर गेला म्हणजे तोंडांत आलेली ओकारीहि वापस जाईल. चला कामाला लागा."

—आणि इतकें बोलूनच ते थांबले नाहीत, तर स्वत:च स्टेजवर जाऊन पहिली घंटी दिली आणि शिटी स्वत:च्या हातात घेतली. वेळेवर सूत्रधार मीच बनलों. सूत्रधाराचें काम झाल्यावर माझ्या हातांत त्यांनी शिटी दिली व नंतर आपण प्रेक्षकांत जाऊन बसले.

नाटक कसें झालें हें अमरावतीकर जाणतातच. त्यादिवशीं नारायणराव नसते तर नाटक झालें नसतें.

*

बडनेर रोडवरून नारायणरावांच्या घराकडे रस्ता वळतो, तेथे एक लहानसा पूल आहे. त्या पूलाच्या पलीकडे आता पाय वळत नाहीत. आम्ही दिवाणजींची स्नेही मंडळी जेव्हा जेव्हा जवळपास भेटतों तेव्हा त्या पुलापाशी गप्पा करीत उभे राहातों. आठ दिवसापूर्वीची गोष्ट आहे. प्राचार्य नेने आणि मी त्या ठिकाणीं भेटलों व बोलत उभे राहिलों. सहज बडनेर रोडवर माझें लक्ष गेलें. वेळ दिवसाची दहाच्या सुमाराची. गर्दीतून एक गृहस्थ चालला होता. लांबोळा चेहरा, डोळ्याला चष्मा, गळ्यांत उपरण्यासारखा टाकलेला स्कार्फ, हातात सिगारेट. क्षणैक—काय झालें कुणास ठाऊक—दिवाणजीच जाताना भासले.

होय! अजूनहि दिवाणजींची मूर्ति समोर उभी राहते. पण हें कसें होतें, कां होतें, कांही सांगता येत नाही.

*

मराठी शाळेंत सोडविलेलीं उदाहरणें मोठेपणीं आठवलीं म्हणजे अधिक चांगलीं समजतात. माझेंहि तसेंच झालें. दिवाणजींचा आणि माझा परिचय ७-८ वर्षांतला. पण आता मागीलहि गोष्टी चक्क आठवतात. दिवाणजी राहात होते तो वाडा पिंपळ्यांचा. त्या वाड्याच्या मागच्या बाजूच्या चाळींत १९२४ च्या सुमारास मी राहात होतों. एका बाजूला दिवाणजी, दुसऱ्या बाजूला भेदे व मध्ये आम्ही. अशीं हीं बिऱ्हाडें होतीं. चाळीच्या समोरील उंबराखाली दिवाणजी व भेदे या दोघांनाहि अगदी लहानपणी मातींत खेळतांना मीं पाहिलें आहे. आता तें अगदी चक्क आठवतें.

दिवाणजी व भेदे—दोघेहि त्याच वाड्यांत लहानपणीं खेळले, तेथेच ते एकत्र शिकले, वाढले, तेथूनच ते एकत्र बाहेर पडले आणि एकत्रच निवर्तले. अखेरच्या दिवशीं दोघांचीहि शवें त्याच वाड्यातून एकत्र बाहेर पडलीं.

"यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ।
समेत्य च व्यपेयातां तद्वत् भूतसमागम:।।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'कुठे तरी जाण्याचा संभव असल्यामुळे...'

गणेश निंभोरकर.

☆

येथील चित्रा टॉकीजवर मी असतांना "देवमाणूस" नाटकाचा प्रयोग त्यामध्ये झाला. तेव्हापासून दिवाणजींचा आणि माझा परिचय अधिकाधिक वाढायला लागला. ह्यापूर्वी व ह्यानंतरहि कांही प्रयोग त्यांनी येथे केले. विद्यालयाच्या स्नेहसंमेलन प्रसंगीहि तेच नाटकांचें दिग्दर्शन करीत असत. या प्रत्येक वेळी त्यांच्या कार्य करण्याच्या तडफदार वृत्तीची मला जाणीव होत होती. जीव ओतून कार्य तडीस नेण्याचें त्यांचें कसब मीं पाहिलें.

मास्तराच्या जागेपासून तो सरकारी महाविद्यालयांमधील प्राध्यापकाचे जागे-पर्यंत ते स्वतःच्या कर्तबगारीने वर चढत गेले. वऱ्हाडशालापत्रकाचे कांही दिवस ते संपादक होते. विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस तर ते अद्यावत होते.

विदर्भ महाविद्यालयांत यंदा ते तृतीय वर्षाचे नाटकाचे तास घेत होते. नाटक शिकवितांना जणूं कांही नाटकांतील निरनिराळीं पात्रेंच बोलताहेत असा भाव निर्माण करून ते विद्यार्थ्यांत खरा 'गडकरी' जागृत करीत. एवढ्याएवढ्यांत तर नाटकांतील विनोदप्रधान भाग सुरू झाल्यापासून त्यांचें प्रवचन खूपच रंगत होतें.

सोमवारला असा विनोदपूर्ण तास घेऊन त्याचे शेवटी ते म्हणाले, "आता शुक्रवारी आपला जो नाटकाचा तास येईल तो, मी कुठे तरी जाण्याचा संभव असल्यामुळे बंद राहील व त्यानंतरचा म्हणजे सोमवारचा जो तास येईल तेव्हा मी तुमची यावर परिक्षा घेणार आहें. तरी त्या तयारीने आपण सर्वांनी यावें."

—आणि खरोखरच शुक्रवारीं ते कॉलेजमधे आले नाहीत! त्याच दिवशीं सायंकाळी त्यांच्या अपघाती मृत्यूची बातमी जेव्हा कानावर आली तेव्हा जो विस्मयाचा काटा शरीरावर उभा राहिला तो जाई ना! शनिवारीं त्यांची प्रेतयात्राच पाहण्याचें नशीबीं आलें!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी कुठे शोधूं ?

ना. रा. शें डे.

*

सुमारे दोनअडीच वर्षांपूर्वीची गोष्ट. मी घाईघाईने दादर स्टेशनांत प्रवेश केला. गर्दी चिकार होती आणि रात्रीची एक्सप्रेस सुटायला अवघीं तीन मिनिटें होतीं. दाराच्या लोखंडी गजाला घट्ट धरून उभा होतों मी.

मी उभा असलेल्या जवळच्या बाकावर एक व्यक्ति अंगाला निळसर शाल लपेटून कांहीतरी वाचण्यांत रमलेली मला आढळली. कुर्ल्यानंतर गाडीचा वेग वाढला. त्या वेगाबरोबर बऱ्याच वेळापासून चालत असलेली रेटारेटीहि वाढली. कुणीतरी मला जोराचा धक्का दिला. माझा तोल सुटला अन् माझ्या हातांतील 'साहित्या'चा अंक त्या अनोळखी व्यक्तीच्या आंगावर पडला. माणूस दचकून बसा जागा होतो तद्वत् अंक हातांत घेऊन तिने माझ्याकडे पहात विचारलें, "तुमचा ना हा अंक ?"

"हो माझाच. क्षमा करा. ह्या रेटारेटीमुळे आपल्याला उगीचच त्रास झाला !"

"छे ! गर्दीत असें व्हायचेंच. पण तुम्ही असे उभे कां ? या, असे बसा शेजारी." त्या व्यक्तीने थोडें सरकून मला बसायला खुणवलें. पडत्या फळाची आज्ञा समजून मी पटकन् ती जागा घेतली. 'हं छान झालं आता,' ती व्यक्ति स्वतःच पुटपुटली. तिने उच्चारलेला 'शेजारी' हा गोड आपुलकी दर्शक शब्द माझ्या अंत:करणाच्या खोल कप्प्यांत समावला !

"कुठं जायचं तुम्हाला ?"
"नागपूरला. अन् तुम्हाला ?"
"बडनेरला उतरेन मी. आपण काय करीत असतां ?"
"सध्या 'पूजे'चें संपादन करतों."
"अरे वा ! फार छान झालें तुमची अचानक भेट झाली."
"पण आपला परिचय ?"
"मी ना. कृ. दिवाणजी."

मी दिवाणजीकडे पाहिलें. त्यांच्या प्रेमळ, सहिष्णु आणि मनमिळाऊ स्वभावासंबंधी मी बरेंच ऐकलें होतें. त्यांच्या उमलत्या कर्तृत्वशक्तीची इतरांकडून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मला जाणीव झाली होती. "साहित्या"चा अंक चाळीत असतांना त्यांची नजर साहित्याचे संपादक श्री. वा. रा. ढवळे यांच्या स्वाक्षरीवर गेली अन् ते उद्गारले, "ढवळ्यांनी का भेट दिली ही! फारच मेहनती आणि सत्प्रवृत्त गृहस्थ आहेत ते!" आणि नंतर त्यांनी विचारलें, "कशाला गेला होतां मुंबईला?"

"पूजेच्या उद्घाटनाप्रीत्यर्थ" मी म्हणालों आणि सांगितलें, "मुंबई-करांनी भारीच जिव्हाळा दाखविला ह्या प्रसंगी. प्रभाकर पाध्ये, श्री. शं. नवरे, काणेकर, प्रा. वि. ह. कुळकर्णी प्रभृतींनी बरेंच उत्तेजन दिलें. विशेषतः मामा वरेरकरांनी 'पूजे'ला जो संदेश दिला तो तर मला फारच मार्मिक वाटला. 'नागपूर आणि मुंबई यांचा सांधा अखंड राहिला पाहिजे. एकमेकांनी एकमेकाचे वाभाडे काढण्यापेक्षा एकमेकाच्या हितसंबंधाकडे लक्ष देऊन मराठीभाषी जनतेचा दर्जा उच्चतर राखला पाहिजे' असें ते म्हणतात.

"अगदी खरें आहे मामासाहेबांचें म्हणणें. आपल्या मराठी भाषी जनतेने महाराष्ट्राचा पूर्वीचा दरारा कायम राखून मराठी साहित्याचा दर्जा अभिमानाने संवर्धिला पाहिजे. बाकी एक गोष्ट खरी की आपल्या नागपूर प्रांतांत जो जोम आणि जी संघटना असायला पाहिजे तशी ती दिसत नाही. अलीकडे विदर्भ-साहित्यसंघ ह्या प्रयत्नाला लागला आहे." दिवाणजींनी आपलें हृदय आत्मविश्वासाने व्यक्त केलें.

आणि मग आमची चर्चा महावैदर्भीय साहित्यिक आणि त्यांचें कार्य यावर सुरू झाली. गडद अंधाराला चिरून गाडी भरधाव पुढे सरकत होती. डब्यांतील जवळपास सर्वच लोक पेंगत पडले होते. त्या निरव निःस्तब्ध डब्यांत केवळ आम्ही दोघे अंतःकरणाची देवाणघेवाण करीत होतों. कडक थंडीच्या झोताने माझें शरीर शहारलें जात आहेसें पाहून दिवाणजींनी आपला अर्धा शाल माझ्या भोवती गुंडाळली आणि माझ्या मांडीला मांडी भिडवून प्रश्न केला, "नागपुरांतील साहित्यिक गटांसंबंधी काय वाटतें तुम्हाला?"

"नागपुरांत तसे 'गट' आहेत असें वाटत नाही मला. समज मात्र तसा आहे. कारण प्रत्येक नामवंत साहित्यिक स्वतःतच गुंगलेला असतो असें दिसतें. दुसरी गोष्ट म्हणजे रोजच्या भेटीगाटीला किंवा चर्चा विमर्शाला प्रोत्साहन मिळेल अशी व्यवस्था मुंबई मराठी साहित्यसंघाप्रमाणे येथे नाही." मी म्हणालों.

"असें आहे खरें. तसें पाहूं गेल्यास डॉ. भाऊजी दप्तरी, कृष्णशास्त्री घुले या सारखे विद्वद्रत्न; भाऊसाहेब माडखोलकर, पु. य. देशपांडेसारखे प्रख्यात कादंबरीकार व जाडे पत्रपंडित, श्री. ना. बनहट्टीसारखे मार्मिक समीक्षक; डॉ. वि. भि. कोलते, ह. ना. नेनेसारखे संशोधक; आ. रा. देशपांडे (अनिल), भ. श्री. पंडीत, या. मु. पाटकांसारखे नाणावलेले कवि; कुसुमाबाई देशपांडे, पु. भा. भावे, श. बा. शास्त्री, गो. रा. दोडक्यांसारखे पट्टीचे लघुकथा लेखक आदि मंडळी कांही कमी नाहीत. ह्या मंडळीने मनावर घेतलें तर केवढें तरी मोठें कार्य साधतां

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येण्यासारखें आहे. नागपूर हें केन्द्रस्थान आहे. कितीतरी साहित्य विषयक चळवळी येथे करता येण्यासारख्या आहेत. माझें वास्तव्य अमरावतीला असल्यामुळे मनांत अनेक कल्पना असूनहि त्या प्रत्यक्षांत उतरवितां येत नाहीत. तरी ह्या सर्वांना एकत्रित कसें पहातां—बोलाविता येईल हा विचार मला अलीकडे सतावत आहे." ते अनेक व्यक्तिसंबंधी बोलले पण त्यांनी प्रत्येकाच्या गुणांचाच उल्लेख केला. इतक्या सरळ मनाच्या, सर्वांचें कल्याणच चिंतणाऱ्या आणि वाईटाचेंहि चांगलें करूं इच्छिणाऱ्या दूरदृष्टीच्या व समन्वय साधणाऱ्या दिवाणजींच्या अगदी जवळ मांडीला मांडी भिडवून मनापासून गोष्टी करीत मी प्रवास केला होता ही आठवण आज—!

त्यानंतर मी अमरावतीला गेलों होतों. चित्रा सिनेमाला वळसा घालून पुढे जाणार इतक्यांत मला कुणीतरी हाक दिली. मी मागे वळून पाहतों तों दिवाणजी!

" विसरलात आम्हाला हं. जवळून चाललांत तरी..."

मी दिलगिरी प्रगट केल्यावर ते म्हणाले, "बरं बरं. चला घरीं चला." फार घाईत असल्याचें सांगितल्यावर ते अस्वस्थ झाले. उन्हाळ्याचे दिवस होते ते. मी घामाधूम झालों होतों. त्यांनी माझ्या डोक्यावर छत्री धरली. आपल्या रुमालाने माझ्या कानाजवळचा घाम पुसला अन् मग म्हणाले, " बरं पण त्या उपहारगृहांत तरी चला. कांही तरी घेऊन जा! तेवढेंच मला समाधान!"

त्यांच्याकडून मी काय घेतलें आहे हें माझें मला माहित आहे पण माझें उभें जीवन शिकण्यासाटी मी कामी आणणार! आता मला कांही हवें असल्यास या माझ्या "शेजाऱ्या"ला मीं कुठे शोधायचें!

वि. सा. संघ–परीक्षा केंद्र मॉडेल हायस्कूल, आर्वी.

दुखवट्याचा ठराव

★

'विदर्भाचे सुप्रसिद्ध साहित्यिक, समाजसेवक व वि. सा. सं. चें सर चिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी हे समाजशिक्षणकार्यार्थ बेहरमला जात असता आकस्मिक मोटार अपघात घडून गेल्या महिन्याचे २५ तारखेस कालवश झाले. त्यांच्या मृत्यूने वि. सा. सं. ची व हिंदराष्ट्राची कल्पनातीत हानी झाली आहे. त्यांच्या आप्तेष्टांच्या दुःखांत आम्ही सहभागी आहोंत. ईश्वर मृतात्म्यास शांति देवो. !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन अश्रुबिंदू !

अच्युत केशव पांडे

☆

हो, दोनच अश्रुबिंदू ! जास्त गाळायला ते उरले कुठे आहेत आता शिल्लक ! संपले सारे. पार्थिव शरीर घरी आणल्यापासून तों तें वैश्वानराच्या स्वाधीन करीपर्यंत त्यांचा पडला सारा पाऊस ! आतां ढग कोरडे झालेत. विजा चमकतात पण पाऊस नाही. काळ झरझरा जातो आहे. स्मृतिनाश करतो म्हणतात तो ! पण दिवाणजींची ही स्मृति नाश करूं शकेल का तो ? हें दुःख आतां कसें विसरणार ?

शेवटलाच तास घेतला त्यांनी तो 'भावबंधन' नाटकाचा. किती जिवंतपणा आणीत असत ते वर्गांत ! त्यांच्या आवाजांतील तो चढउतार, ती लकब व सहजगत्याच होणारा तो अभिनय ! सारें सारें कांही अगदी उभे राहतें डोळ्यापुढे. त्यांना 'डिफिकल्टी' विचारावयास गेलों की प्रत्येकवेळी माझ्या डोक्यावर थापड मारून ते एकदम म्हणत—'पांडे, मूर्ख आहेस तूं अगदी' व मग आपल्या नेहमीच्या पाल्हाळिक पद्धतीनें समजावून सांगत सारें कांही ! का थापड मारीत असत ते मला ? का मूर्ख म्हणत असत ते मला ? कुणाला विचारूं मी हे प्रश्न ? कोण देईल यांचें उत्तर ?

मी माझ्या विद्यार्थी-मित्रांत एखादेवेळी म्हणत असे की ' आपले दिवाणजी सर रिचर्ड लिव्हिंगस्टोन च आहेत अगदी !' नाटक शिकवितांना ते त्यावर टीका जरूर करीत असत; परंतु त्यांची टीका इतकी कठोर कधीच होत नसे की त्यामुळे विद्यार्थी मूळ अर्थाशी समरस होऊन त्यांत गुंगून जाणार नाहीत; टीकेकडे त्यांची दृष्टि कमीच. मूळार्थाशी ते समरस होत व विद्यार्थ्यांना समरस करीत हीच त्यांची थोरवी !

'गिरसाप्पा कोसळला नऊशे फुटावरून खाली' हें भावबंधनांतील प्रभाकराने उच्चारलेलें वाक्यच समजावून सांगितलें त्यांनी त्या दिवशी. शेवटलाच तास व समजावून सांगावयाचें त्यांचें शेवटलेंच तें वाक्य ! पुन्हा दिवाणजी वर्गांत आले नाहीत; पुन्हा त्यांनी गडकऱ्यांचें वाक्य समजावून सांगितलें नाही !

कवि गिरीशांनी गोविंदाग्रजांबद्दल म्हटलें आहे—"या अद्‌भुत किमयागाराने जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत कष्ट, हाल, त्रास, यातना, वेदना सोसून जीवनाशी प्रामाणिक राहून आपलें वाङ्मय निर्माण केलें, इतकेंच काय पण एका डोळ्यांतील प्राण गोटला व दुसऱ्या डोळयांतील घुटमळला असतांनाहि 'भावबंधन' नाटकाचा शेवटचा प्रवेश पुरा केला व आपली जीवनयात्रा संपविली, त्यावेळी मनाला सहस्त्र विंचू डसल्याप्रमाणे वेदना होतात व आपण गडकऱ्यांच्या व्यक्तिमत्वाकडे अधिक ओढले जातों"! किती यथार्थतेने लागूं पडतें हें वाक्य आमच्या ह्या प्राध्यापकाला सुद्धा ! स्वर्गांत भेटतील हे दोघे एकमेकांना, जें त्यांना इथे शक्य झालें नाही तें तिथे साध्य करण्याकरितां !

———

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

असें बोलून तो जो गेला....!

रा. पु. सगदेव

✩

अश्रूंच्या ओघामुळे लेखणीचा झोक जाऊं पहातो. तथापि बळेच लिहिण्याचा प्रयत्न करीत आहें.

मनामिळाऊ व दिलदार स्वभाव, अंगिकारलेल्या कार्याची आत्यंतिक आवड, निरहंकार, निःस्पृहता, काम करण्याची तळमळ व तें आटोपून पार पाडण्याची लगबग, वेळप्रसंग पाहून चपराशाचेंहि काम करण्यास खंत नाही आणि अंतःकरणापासूनचा आपलेपणा इत्यादि अनेक गुणांमुळे प्रिय मित्र नारायण हा सर्वांस हवासा झाला होता. काळ त्याच्यावर अशा रीतीनें आकस्मिक झडप घालील हें कोणास स्वप्नांतहि वाटलें नाही. त्याच्या स्वभाव-विशेषांचीं दोनच उदाहरणें येथे देऊन मी आपली पुष्पांजली त्याला अर्पण करितों.

दोन वर्षांपूर्वी इथे तो एका लग्नाला आला होता. लग्न आटोपून मला भेटण्याकरिता म्हणून तो माझे घरी आला. मी घरी नव्हतों. माझा सर्वांत लहान मुलगा त्यावेळी निमोनियाने फारच आजारी होता. घरांत माझ्या पत्निखेरीज दुसरें मोठें असें कोणीच नव्हतें. मुलाच्या अस्वस्थपणामुळे मेजवानीचें जेवण सोडून मी परत येईपर्यंत मुलाची सुश्रूषा करीत तो सतत चार तास एकसारखा माझ्या मुलाजवळच बसून होता.

अपघातापूर्वी पंधराच दिवस अगोदर झालेली भेट. 'नारायण तूं इथे या वेळी कसा?' म्हणून मीं विचारलें. तेव्हा—'तात्या, संघाचें वर्ष संपायला अवघा दीडच महिना राहिला. संमेलनाच्या नक्की स्थलाचा पत्ता नाही. शिवाय निवडणुकी व्हायच्या आहेत. कसेंहि करून यंदा संमेलन झालेंच पाहिजे, व तेंही शक्य तोंवर चांद्यासच व्हावें अशी माझी इच्छा आहे. केवळ याच करिता मी येथे आलों. मी सरचिटणीस असलों तरी तूं चिटणीस आहेस हें विसरू नकोस. संमेलनाची जबाबदारी माझ्या इतकीच तुझ्यावरहि आहे हें लक्षांत ठेव. तसेच सभासदांची वाढहि झाली पाहिजे बरं का?' असें बोलून तो सायकलवर बसून जो गेला तो आता मला पुन्हा कुठून दिसणार?'

अंतःकरणांतलें त्याच्या संबंधी पुष्कळच लिहावेंसें वाटतें.

———

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हन्त ! हन्त !

स. गो. सोमलवार

☆

मत्प्रियसुहृद्वर्याणां प्रियशिष्याणामधुना विदर्भमहाविद्यालये महाराष्ट्रभाषाध्यापनकर्मणि विनियुक्तानां श्रीमन्नारायण कृष्ण दिवाणजी-महाभागानां दैवदुर्विलसेनाकस्मिकीं निधनवार्तां श्रुत्वा या मदीयान्तःकरणस्यावस्थाऽभवत्, यश्चाघातश्चेतसि समुद्पद्यत तं शब्दैर्वर्णयितुं न पारयामि। व्यभ्रो वज्रपात इव, आकस्मिको भूकंप इव तेषां मृत्युः सर्वान् अस्मान् व्यचालयत्। तेषां समागमसुखं सुचिरं मयाऽमरावतीपत्तनेऽन्वभावि। यदाऽहं विदर्भमहाविद्यालयतः नागपुरमहाविद्यालेय परिवर्तितस्तदारभ्य यद्यपि तेषां साहचर्यं खण्डितमासीत्, तथापि चिरन्तनस्नेहवशात् तेषां नागपुरेऽपि काले काले समागमनमभूत्। येनास्माकं परिचयतरुः सार्वकालमुपचीयमान एवासीत्।

एकस्मिन् समये विदर्भमहाविद्यालये संस्कृतमण्डलस्य महोत्सवेऽस्माभिः शाकुन्तलनाटकमभिनैतुं निश्चयः कृतः। तस्मिन् समये दिवाणजी महोदया मया अभ्यर्थिता सहाय्यप्रदानार्थम्। संस्कृतनाटकस्य नाममात्रं निशम्य दिवाणजीमहोदयानामानन्दः परांकोटिमगात। तैः सर्वाणि कार्याणि परित्यज्य दिवा वा रात्रौ वा दीर्घमध्यानमाक्रम्याभिनयकलायां विद्यार्थिनो महतोत्साहेन विनीय शाकुन्तलस्य रंगभूमौ प्रयोगः यशस उच्चैस्तमं शिखरमध्यारोपितः। तत्राभिनये, संगीते, वेषभूषायां, नेपथ्यरचनायां—किं बहुना—सर्वेष्वेव नाट्योपकरणेषु स्वयं परिश्रमं कृत्वा, मदीयं कार्यं स्वकीयं मत्वा, विदर्भमहाविद्यालयसंस्कृतमण्डलस्य कीर्तिध्वज उच्छ्रायस्य परां कोटिं प्रापितः।

१९४६ तमे खिस्ताब्दे नागपुरे प्राच्य-विद्या-परिषदोऽधिवेशनमभूत्। तदा महामहोपाध्याय मिराशीमहोदयानामाज्ञयाऽस्माभिर्महाकवेर्भासस्य स्वप्नवासवदत्त नाटकस्य प्रयोगो निश्चितः। एतदर्थमपि मया पूर्ववद्विज्ञप्ता दिवाणजीमहोदयाः पत्रद्वारेण। पत्रसंदर्शनसमकालमेव महता प्रमोदेन स्वीकृतं कार्यं तत्रभवद्भिः। तदनुरोधात् आत्मनः सौकरीमविगणय्य नागपुरमागत्य मदीये गृहे उषित्वा, स्वप्नवासवदत्तं अभिनयार्थीकृतम्। नाट्यप्रयोगविषये तैर्महान्तः परिश्रमाः कृता येषां वर्णनं स्थलाभावान्नाधिकमस्माभिरत्र कर्तुं शक्यते। विशेषस्फुटतया दृष्टिपथमायातं सर्वेषां, यत् संस्कृतनाटकानामपि अभिनयरहस्यं तैरात्मनः परमसूक्ष्मया निसर्गपटीयस्या प्रज्ञया आत्मसात् कृतम्। तदनुरोधात् शिक्षिता विद्यार्थिनटनट्यः

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाटकस्यान्तर्गतं भावं महता कौशलेन साकल्येन प्रकटयाञ्चक्रुः। संस्कृतनाटकानि प्राचीनतमान्यपि अद्यतनायां रङ्गभूमौ कीदृशं यशः सम्पादयितुं प्रभवन्ति इत्येतद् दिवाणजी-महाभागैर्निखिलभारतवर्षात् समागतानां नानाविधानां विपश्चितां दृष्टिपथं प्रापितम्। येन ते सर्वे एव प्रेक्षका दिवाणजीमहोदयं भृशं प्रशशंसुः। अपूर्व-नाट्यप्रयोगसंदर्शनजनितकुतूहलानां विस्मयोत्फुल्लविलोचनानां पण्डितानामनल्पीय-सीभिरभिनन्दनवाग्भिस्तस्मिन्समये मुखरोऽभवत्प्राच्यविद्यापरिषन्मण्डपः। मन्ये श्रीमद्भिर्नेदृशं क्वापि यशो लब्धपूर्वम्। एवं समस्तविद्वद्वृन्दमुखारविन्दविनिःसृत-स्तुतिमकरन्दधवलितविग्रहः कस्मादकस्मादेवास्तमुपगतोऽयमपूर्वो जगन्मित्रभूतो बालनारायण इति न जानीमः। किमन्यत्। दौर्भाग्यमेव न केवलमस्माकं किंतु निखिलस्य भारतवर्षस्य! हन्त! हन्त!

अस्तं गतोऽयमरविन्दवनैकबन्धु-
र्भास्वान् न लङ्घयति कोऽपि विधिप्रणीतम्॥

प्रीतीची रीत!

(Whom Gods love die young)

☆

प्रीतीची रीत तुझी नवलाची देवा! ॥ध्रु॥
बालक नवजात छान
पितरांचें सुखनिधान
सबलींचा तूं हन्ता !, का तदीय केवा ? १
मंजुलसें नित बोलें
दुडुदुडु वा जें चालें
लोभविशी दाखवुनी सांग काय मेवा ? २
सेवण्यांत यौवनफल
रमले जे अल्पकाल
धृष्टपणे करण्या का नेशी निज सेवा ? ३
देशधर्म जनहितार्थ
झटती जे त्यजुनि स्वार्थ
पाचारुनि दावितोस 'सकलहर्तृ' भावा ! ४
सर्वशक्ति गुणशाली !
इच्छा जी तुज झाली
पूर्तीस्तव लागे का काल कधी रावा ? ५
तुजसि हवा जो कोणी
देवाज्ञा—! यम आणी
हाव अशी असतां तव करिल कोण हेवा? ६

—दा. ल. अडोणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांना देवाने कां नेलें ?

राम देशपांडे

※

मनुष्याच्या आयुष्यांत काळ हा वेळ सांगून येत नसतो. श्री. कै. दिवाणजी ह्यांच्याहि बाबतींत असेंच झालें. अचानक काळ आला व त्याने त्यांना उचलून नेलें. काळाने जरी दिवाणजी ह्यांच्या आयुष्याचा तात्काळ शेवट केला असला तरी त्यांच्या आयुष्यांतील स्मृति नेहमीच अमर राहतील.

वर्षाऋतूंमधील काळ्या व भेसूर ढगांतून निघणारी दैदिप्यमान वीज क्षणभर चमकावी व तात्काळ नाहीशी व्हावी तसेंच श्री. कै. दिवाणजींच्या आयुष्याचें झालें. परिस्थितीच्या भेसूर ढगांतून मार्ग काढीत असतांना ते दैदिप्यमान प्रकाशाने चमकले व तात्काळ नाहीसे झाले. घरची गरीबी, निराधार परिस्थिति, अशा वेळेस श्री. कै. दिवाणजी ह्यांनी जीवनाशी झगडण्यास सुरुवात केली. प्रतिकूल परिस्थिति मनुष्याच्या सर्वस्वाचा नाश करूं शकते परंतु ध्येयाचा नाही. मनुष्य परिस्थितीचा गुलाम असतो असें म्हणतात; परंतु दिवाणजींच्या बाबतीत तसें नव्हतें, परिस्थितीला त्यांचे गुलाम व्हावें लागलें. विद्यार्थीदशेनंतर अध्यापक व अध्यापकानंतर प्राध्यापक असे आयुष्याच्या प्रवासांतील तीन टप्पे त्यांनी अल्प-काळांतच पूर्ण केले.

सुहास्य, समाधान व शान्तता ह्या त्रिकोणांत त्यांचा स्वभाव वसविलेला होता. आयुष्यांत आनंदाचे क्षण आले म्हणजे खूप हसावें व दुःख झालें म्हणजे दुःखांतून सुख काढावें, अशा प्रकारची त्यांच्या स्वभावाची घडण होती. आयु-ष्यांतील खडतर प्रसंगींसुद्धा त्यांनी परिस्थितीचे घाव फुलासारखे झेलले व त्यांतून पुढील मार्ग काढला.

"काम म्हणजे देव" (work is god) ह्या उक्तीची सत्यता श्री. कै. दिवाणजी ह्यांच्याकडे बोट दाखवूनच पटवितां आली असती. कोणतेंहि काम करण्याची त्यांची निष्ठा, केलेले कष्ट व दाखविलेली तत्परता आठविली म्हणजे त्यांच्याबद्दल आदर व भूषण वाटल्याशिवाय राहत नाही. श्री. कै. दिवाणजी ह्यांच्याबरोबर ज्यांनी नाटकांच्या तालमीकरितां रात्रीचे दिवस केले असतील त्यांना माझ्या म्हणण्याची सत्यता पटल्याशिवाय राहणार नाही.

परंतु आतां त्याचें काय ! क्षणापूर्वी हसरी असलेली चर्या शांत झाली व तें सुहास्य निमालें तें कायमचें ! मनुष्य आयुष्यांत निरनिराळे बेत योजीत असतो परंतु त्याचें दैव त्यांच्याकडे विकट हास्य करून पाहत असतें. दैवाने श्री. कै. दिवाणजी ह्यांच्या सर्व आशा, आकांक्षावर असेंच पाणी फिरविलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

विदर्भ साहित्यसंघाच्या १९५० सालासाठी अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या सभासदाची वार्षिक निवडणूक दिनांक १४ जानेवारी रोजी होऊन खालील सभासद रीतसर निवडून आले.

अध्यक्ष

श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

कार्यकारी मंडळ.

न्या. मू. के. टी. मंगळमूर्ति.
डॉ. यशवंत खुशाल देशपांडे.
प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी.
श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे.
डॉ. माधव गोपाळ देशमुख.
प्रिं. हरि नारायण नेने.
डॉ. विष्णु भिकाजी कोलते.
प्रा. वामन कृष्ण चोरघडे.
श्री. द. रा. गोमकाळे.
श्री. रा. पु. सगदेव.
श्री. प्र. ना. खोडे.
प्रा. भवानीशंकर पंडित.
श्री. शकुंतलाबाई दिवाणजी.
श्री. शंकर नारायण सहस्रबुद्धे.

वि. सा. संघ. —शं. ना. सहस्रबुद्धे
२९-१-५० सरचिटणीस.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
युगवाणी कार्यालय, वझलवार कॉलनी, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ